गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक)
Mo. 9372444001

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०८.०२.२०२५ | अंक नं. २८७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मो. हरी बाळाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

## ‘बिबट्या’च्या भीतीने शेतीची कामे खोळंबली, हातातोंडाशी आलेली पिके करपण्याची शक्यता


नगर तालुक्यातील कामरगाव परिसरात शुक्रवारी (७ फेब्रुवारी) रात्री शेतकऱ्याला दिसलेला बिबट्या.

नगर - नगर तालुक्यात अनेक गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर वाढला असल्याने त्याच्या भीतीने शेतकरी, शेतमजूर रात्रीच नव्हे तर दिवसाही शेतात जायला घाबरू लागले आहेत, त्यामुळे शेतीची कामे ठप्प झाल्याचे चित्र गावागावात दिसत आहे. परिणामी पाण्याअभावी हातातोंडाशी आलेली गहू, हरबरा, ज्वारीची पिके करपण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या परिस्थितीमुळे शेतात जावे तर बिबट्याची भीती आणि नाही जावे तर पिकांचे नुकसान या दुहेरी संकटात शेतकरी वर्ग सापडला आहे.

नगर तालुक्यातील कामरगाव परिसरात काळ्याचा डोंगर, विठ्ठलवाडी, शहा डोंगर, कामरगाव व पिंपळगाव कौडा गावच्या शिवेचा परिसर या भागात दररोज कुठेना कुठे बिबट्या दिसत आहे. ७ फेब्रुवारीला रात्रीही एका शेतकऱ्याला शेतात बिबट्या दिसला. त्याने त्याचा व्हिडीओ ही मोबाईलमध्ये काढून वन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना पाठविला आहे.

सारोळा कासारच्या बारेमळा परिसरातही गेल्या ३-४ दिवसांपासून एक मादी बिबट्या आणि त्याचे २ बछडे शेतकऱ्यांच्या नजरेस पडत असल्याने शेतकरी धास्तावले आहेत. मळ्यात राहणारे शेतकरी व त्यांचे कुटुंबीय सायंकाळ नंतर घराबाहेर पडायला घाबरत आहेत. अनेक जण रात्रीच नव्हे तर दिवसही शेतात जायला धजावत नाहीत. त्यामुळे या परिसरातही शेतीची कामे ठप्प आहेत.

अशीच परिस्थिती भोरवाडी गावच्या परिसरात भोरवाडी ते चास रस्त्यावरील डोंगर भागात आहे. याशिवाय मेहेकरी, बारदरी व चांदबीबी महालालगत असलेली गावे, जेऊर, ससेवाडी, चापेवाडी, मांजरसुंबा, विळद या परिसरातही बिबट्यांचा वावर असल्याने याचा परिणाम आता शेती व्यवसायावर झाला आहे. बिबट्याच्या भीतीमुळे शेतमजूर कामावर यायला तयार नाहीत. त्यामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत.

बिबट्यामुळे एकीकडे नागरिक घाबरले असताना विभागाकडून कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना केली जात नाही. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे उपलब्ध केले जातात पण त्यात ठेवलेल्या भक्षाची सर्व व्यवस्था परिसरातील शेतकऱ्यांनाच करावी लागत असल्याने शेतकरी वर्गात नाराजी पसरली आहे.

### ‘महावितरण कंपनी’ने दिवसा वीजपुरवठा करावा

बिबट्याच्या वाढत्या भीतीमुळे शेती कामांवर विपरित परिणाम झाला आहे. शेतातील पिके आता हातातोंडाशी आली आहेत. या पिकांना सध्या किमान एक किंवा २ पाण्यांची गरज आहे. मात्र शेतीसाठीचा वीजपुरवठा हा रात्रीच्या वेळी केला जात असल्याने बिबट्याच्या भीतीने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देणे अवघड बनले आहे. परिणामी ही पिके करपून जाण्याची आणि शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे महावितरणने शेतकर्यांलना दिवसा वीज द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

### आमदार, खासदारांनी लक्ष घालण्याची गरज

नगर तालुक्यातील गावे ही ३ मतदार संघात विभागलेली आहेत. त्यामुळे तालुक्याला आ.शिवाजी कर्डिले, आ.विक्रम पाचपुते, आ.काशिनाथ दाते हे तीन आमदार आहेत. विशेष म्हणजे हे तीनही आमदार सत्ताधारी पक्षाचे आहेत. शिवाय खा. निलेश लंके आहेत. या सर्वांनी बिबट्यामुळे शेतकऱ्यांवर ओढलेल्या या संकटात लक्ष घालण्याची गरज आहे. या लोकप्रतिनिधींनी गावागावातील बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी ठोस उपाययोजना वनविभागाने कराव्यात या साठी वन विभागावर दबाव वाढवावा, तसेच सध्या शेतातील पिकांना पाण्याची गरज असल्याने शेतकऱ्यांना थोडे दिवस का होईना रात्री ऐवजी दिवसा वीजपुरवठा कसा करता येईल या साठी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## नगरमध्ये चेन स्नॅचिंगचे सत्र सुरु, महिलेचे गंठण हिसकावून पळवले

### नवीन टिळक रोडवरील घटना, दुचाकीवरील दोघांवर गुन्हा दाखल

नगर - दुचाकीवर येवून रस्त्याने जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसका मारुन तोडून नेण्याच्या घटना नगर शहरात पुन्हा सुरु झाल्या आहेत. अशीच एक घटना शहरातील अतिशय वर्दळीच्या नवीन टिळक रोडवर ६ फेब्रुवारीला सायंकाळी ७.३० च्या सुमारास घडली आहे. मोपेडवर घराकडे चाललेल्या महिलेच्या गळ्यातील १ लाख २९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण दुचाकीवर आलेल्या दोघांनी हिसका मारुन तोडून नेले आहे.

याबाबत सौ.मिनाबाई बाळासाहेब शिरसाठ (वय ४०, रा. इधाते शाळेजवळ, भगवानबाबानगर, सारसनगर) यांनी ७ फेब्रुवारीला दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी शिरसाठ या ६ फेब्रुवारीला सायंकाळी ७.३० च्या सुमारास नवीन टिळक रोडने मोपेडवर घरी जात असताना निमंत्रण हॉटेलच्या जवळ पाठीमागून मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी शिरसाठ यांच्या मोपेडजवळ येऊन मोटारसायकलचा वेग कमी केला. त्यांना काही कळायच्या आत पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाचे १ लाख २९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण बळजबरीने हिसकावून ओढून तोडून ते सक्कर चौकाच्या दिशेने भरधाव वेगात निघून गेले. शिरसाठ यांना बसलेल्या धक्क्यामुळे त्या खाली पडून जखमी झाल्या. त्यांनी दवाखान्यात उपचार घेतल्यावर याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी सौ. मीनाबाई शिरसाठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण पाटील हे करीत आहेत.

## मनपाच्या सदनिकेत राहतो एक अन् घरभाडे कपात दुसऱ्याच्याच पगारातून

### बांधकाम व आस्थापना विभागाचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्यावतीने कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकेत राहणाऱ्या कर्मचाऱ्याऐवजी जो दुसरीकडे राहात आहे, त्या कर्मचाऱ्याच्या पगारातून घरभाडे कपात केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे महापालिकेच्या बांधकाम विभागाचा आणि आस्थापना विभागाचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर आला आहे.

याबाबतची मिळालेली माहिती अशी की महापालिकेत एका विभागात कार्यरत एका कर्मचाऱ्याने बांधकाम विभागाकडे सदनिकेसाठी अर्ज केला होता. तो मंजूर करत बांधकाम विभागाने त्याला महापालिकेच्या बोट हाऊस येथील सदनिका १६ जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशानुसार मंजूर केली. मात्र त्या कर्मचाऱ्याला कोणती सदनिका दिली त्याची माहिती देण्यात आली नाही, त्याला सदनिकेची चावीही दिली गेली नाही. बांधकाम मधील अधिकारी आज -उद्या करत चालढकल करत राहिले. त्यानंतर जानेवारी महिन्याचा पगार नुकताच झाला तेव्हा त्या कर्मचाऱ्याला धक्काच बसला. कारण त्याच्या पगारातून घरभाडे म्हणून ५५८४ रुपये कपात झाले होते.

त्या कर्मचाऱ्याने अधिक माहिती घेतल्यावर त्याला जी सदनिका मंजूर करण्यात आली होती त्यात दुसराच कर्मचारी राहात होता. या कर्मचाऱ्याला सदनिका मंजूर करताना अगोदर राहणाऱ्या कर्मचाऱ्याकडून ती खाली करून घेतली नाही. परंतु या कर्मचाऱ्याला सदनिका मंजूर केल्याचा रिपोर्ट आस्थापना विभागाला पाठविण्यात आला. आस्थापना विभागानेही अवघ्या १५ दिवसांसाठी १ महिन्याचे घरभाडे त्या कर्मचाऱ्याच्या पगारातून कपात केले आहे. सदनिकेचा ताबा मिळालेला नसतानाही पगारातून घरभाडे कपात झाल्याने त्या कर्मचाऱ्याने उपायुक्तांना निवेदन देत आपल्यावर झालेल्या अन्यायाचा पाढा वाचला आहे.

तसेच मला सदनिका देवू नका मात्र माझ्या पगारातून विनाकारण कपात केलेली घरभाड्याची रक्कम तरी मला परत द्या, अशी मागणी केली आहे. असाच प्रकार आणखी काही कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही झाला असल्याचे या कर्मचाऱ्याने सांगितले. त्यामुळे महापालिकेच्या बांधकाम विभागाचा आणि आस्थापना विभागाचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर आला असून त्याची चांगलीच चर्चा महापालिका वर्तुळात रंगली आहे.

दुकान भाड्याने देणे आहे
नवीपेठ मध्ये पोखरणा ज्वेलर्स शेजारी 300 स्क्वे.फू. दुकान भाड्याने देणे आहे
Mo. 7350012310 / 8888965980

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon, Ahilyanagar 414006
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल
अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387

## ‘मैं यहाँ का डॉन हू’ असे म्हणत व्यापाऱ्याला मागितली ‘खंडणी’

### नगरच्या मार्केट यार्ड मधील घटना, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - ‘यहा व्यापार करना है तो मुझे पाच हजार रुपये महिना देना पडेगा, मैं यहाँ का डॉन हू’ असे म्हणत कल्याण येथील फळ विक्रेत्या व्यावसायिकास धमकी देऊन खंडणीची मागणी करीत मारहाण केल्याची घटना नगर येथील फळ मार्केट येथे ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली.

याबाबतची माहिती अशी की पंकज कुमार मुरली प्रसाद वर्मा (वय २९, रा. लक्ष्मी मार्केट, कल्याण जि. कल्याण) हे फळ व्यावसायिक नगर येथील फळमार्केट येथून फळ खरेदी करून कल्याण येथे फळविक्रीचा व्यवसाय करतात. ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी वर्मा हे बागवान यांच्या फळाच्या गाळ्यामध्ये कामगारा समवेत बोलत असताना तेथे तीन अनोळखी इसम आले. त्यातील एक जण म्हणाला, ‘मुझे अभी पता चला है की तू यहाँ पर व्यापार करता है, तुझे यहाँ व्यापार करना है तो मुझे पाच हजार रुपये महिना देना पडेगा, तुम मुझे जानता नही मै इधर का डॉन सॅम ख्वाजा हु’ असे म्हणून शिवीगाळ केली. त्याच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी इसमानी वर्मा यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या घटनेने वर्मा हे घाबरून गेले. त्यांची मानसिक स्थिती ठीक नसल्याने त्यांनी त्यावेळी फिर्याद दिली नाही. त्यानंतर त्यांनी ७ फेब्रुवारी रोजी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी सॅम ऊर्फ समीर शेख याच्यासह दोन अनोळखी इसमाविरुद्ध भा.न्या.सं. ३०८ (५) ११५ (२) ३५१ (२) ३५२, ३ (५) अन्वये गुन्ह्याची नोंद केली, असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सेदवाड हे करीत आहे.

THE GREATEST EVER DISCOUNT OFFER
BIG DISCOUNT DAYS
Any Course Just in 1450/-
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
MS-OFFICE ADV. EXCEL TALLY GST | 2D CAD 3D CAD CORELDRAW PHOTOSHOP | ILLUSTRATOR IN DESIGN C PROGRAMMING C++ | CANVA CHAT GPT BANKING TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, A.nagar 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, A.nagar. 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, A.nagar. 7447761769

VAISHNAVI TILES & TRADING CO.
◆ सर्व प्रकारच्या टाइल्स ◆ ग्रॅनाइट ◆ सॅनिटरी वेअर
◆ पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग ◆ C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA TILES • BATHWARE | KERAKOLL The GreenBuilding Company | CARYSIL German Engineered | colortile | RAK CERAMICS | NIRALI | TIMEX | ICON

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## अभिजात मराठी 'ज्ञानभाषा' व्हावी...

अलीकडेच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेच्या आजवरच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. पण नुसता अभिजात दर्जा मिळाला म्हणून अभिमान बाळगून चालणार नाही तर मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी काय करायला हवं यादृष्टीने येणाऱ्या काळात पावले टाकली गेली पाहिजेत.

एक भाषा म्हणून ती ताकद, ते व्याकरण, ती शब्दसंख्या, नवनवे शब्द, नव्या संज्ञा, नव्या संकल्पना स्वीकारण्याएवढी लवचिकता हे सर्व काही मराठी भाषेकडेही आहे. यासाठी जपानचं उदाहरण मी नेहमीच सांगत आलोय. १२ कोटी लोकसंख्या असणाऱ्या जपानला जपानी भाषा व लिपीविषयी जबरदस्त आत्मविश्वास आहे आणि जापनीज्मध्ये मेडीकल, इंजिनिअरींग करता येतं. विज्ञानाचंही अगदी अद्ययावत संशोधन जापनीज् भाषेतूनच होतं.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

एक भाषा म्हणून ती ताकद आपल्या मराठी भाषेकडेही आहे. म्हणजेच मराठी भाषेची 'फंडामेंटल्स' पक्के आहेत. अमेरिकेतल्या शिकागो व कोलंबिया विद्यापीठांत, कॅनडाच्या ब्रिंन्स विद्यापीठात, मॉस्कोलसहित काही ठिकाणी मराठी भाषेचे स्वतंत्र विभाग आहेत.

पारतंत्र्यात असतांनाही स्वातंत्र्यासाठी भाषेची तलवार उपसणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणाले होते की, 'इंग्रजी वाघिणीचं दूध' पिऊन मराठी जास्त धष्टपुष्ट होईल. आता तर आपण स्वतंत्र व अधिक समृद्ध आहोत.

माजी सनदी विशेषज्ञ अविनाश धर्माधिकारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा २० मार्च ते १ एप्रिल दरम्यान विराजमान होणार

### आंबेडकरी समाज व पूर्णाकृती समितीमधून अशोक गायकवाड यांची हकालपट्टी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा २० मार्च ते १ एप्रिल दरम्यान विराजमान होणार असल्याचा निर्णय एका बैठकीत घेण्यात आला.

नगर – शहरातील मार्केटयार्ड चौकात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीचे काम पूर्ण झाले असून, आता केवळ पुतळा स्थापनेचा सोहळा पार पाडण्याचे काम बाकी आहे. यासाठी शहरातील आंबेडकरी समाज व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा समितीच्या वतीने हॉटेल राजयोग येथे बैठक आयोजित करण्यात आली. यात पुतळा स्थापना सोहळ्याबाबत मते मांडली. चर्चेनंतर २० मार्च ते १ एप्रिल या कालावधीत स्थापना सोहळ्याचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत १० फेब्रुवारी रोजी बैठक होणार आहे. यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थकृती पुतळा आयुक्तांनी पुढाकार घेऊन पालिकेत बसवण्यात यावा तसेच अशोक गायकवाड यांनी पूर्णाकृती पुतळा समितीच्या विरोधात घेतलेल्या भूमिकेबाबत सर्व आंबेडकरी समाज व पूर्णाकृती समितीच्या वतीने समितीमधून हकालपट्टी करण्यात आली. तसेच इथून पुढे अधिकृत पुतळा समिती पूर्णाकृती पुतळा अनावरण होईपर्यंत सर्व अधिकृत कामे करेल तसेच या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीचे नेते संभाजीराव भिंगारदिवे यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

यावेळी सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, अजय साळवे, किरण दाभाडे, सुनील शिंदे, सुनील क्षेत्रे, रोहित आव्हाड, योगेश साठे, संजय जगताप, संजय कांबळे, विजय गव्हाळे, सागर ठोकळ, अमित काळे, विलास साठे, प्रा.जाधव सर, प्रशांत गायकवाड, बंटी भिंगारदिवे, महेश भोसले, गौतमीताई भिंगारदिवे, विशाल गायकवाड, पोपट जाधव, वैभव कांबळे, मेहेर भिंगारदिवे, जीवन कांबळे, डॉ.भास्कर रणनवरे, शिवाजी भोसले, सिद्धांत कांबळे, अंकुश मोहिते, संजय शिंदे, सारंग पाटेकर, गणेश गायकवाड, आदित्य विधाते, सिद्धांत साठे, जय कदम, तेजस संगले, आकाश कदम, स्वयम् भिंगारदिवे, सागर विधाते, विजित कुमार थोंबे, रंजना भिंगारदिवे, हिराबाई भिंगारदिवे, संजय साळवे, सुरेश भिंगार दिवे, अशोक खंडागळे, विशाल भिंगारदिवे, अशोक रणदिवे, श्याम पाचारण, दीपक अमुत, आकाश निरभवणे, दीपक लोंढे, सुहास पाटोळे, अक्षय भिंगारदिवे, अमेय रणदिवे, मंगेश मोकल, सतीश शिरसाठ, समीर भिंगारदिवे, संदीप पाखरे, विजय कदम, सचिन शेलार, दिनेश पंडित, प्रदीप शेलार, सचिन साठे, रत्न तूपविहिते, आकाश फुलारे, ऋषि विधाते आदीसह पदाधिकारी तसेच आंबेडकरी समाज बांधव उपस्थित होते.

पूर्णाकृती पुतळा समितीचे पदाधिकारी आणि सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, अहिल्यानगरच्या ऐतिहासिक घडामोडीत हा सोहळा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



'दिल्ली विधानसभा' निकालानंतर भाजपकडून नगरमध्ये विजयोत्सव साजरा करण्यात आला.

# 'दिल्ली विधानसभा' निकालानंतर भाजपकडून नगरमध्ये विजयोत्सव

नगर – दिल्लीतील विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर भारतीय जनता पार्टी अहिल्यानगरच्यावतीने लक्ष्मीबाई कारंजा गांधी मैदान येथील भाजपा कार्यालयात विजयोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी महानगराचे उपाध्यक्ष धनंजय जाधव, सचिन पारखी, प्रशांत मुथ्था, नरेंद्र कुलकर्णी, पंडित वाघमारे, दत्ता गाडळकर, बाळासाहेब गायकवाड, मयुर बोचुघोळ, साहिल शेख, आकाश सोनवणे, राजेंद्र काळे, अनिल सबलोक, सुनिल तावरे, करण डापसे, रामदास आंधळे, मिलिंद गंधे, बाळासाहेब भुजबळ, सुनिल सकट, ओंकार लेंडकर, अमोल निस्ताने, वैभव झोटिंग, सुजित खरमाळे, नितीन शेलार, कैलास गर्जे, ज्ञानेश्वर धिर, रोहित पथारे, महावीर कांकरिया, प्रकाश जोशी, सचिन पळशीकर, सुमित इप्पलपेल्ली, गणेश कानंगावकर, विनोद बोगा, राखी आहेर, सोनाली पाठक, निशांत दातीर, बाळासाहेब गायकवाड आदी उपस्थित होते.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका

### झेंडीगेट परिसरात पोलिसांची कारवाई, दोघांवर गुन्हा दाखल

नगर – कत्तल करण्याचे उद्देशाने पत्र्याचे शेडमध्ये दोरीने बांधुन ठेवलेल्या २ गोवंशीय जनावरांची कोतवाली पोलिसांच्या पथकाने सुटका केली आहे. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील झेंडीगेट परिसरात आर. आर.बेकरी जवळ ८ फेब्रुवारीला पहाटे १ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की झेंडीगेट येथील बेकरी जवळ राजु कुरेशी यांचे बंद पत्र्याचे शेडमध्ये काही गोवंश जनावरे डांबून ठेवलेली आहेत व त्यांची कत्तल केली जाणार आहे, अशी माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. या माहिती वरून पोलिसांनी तेथे पहाटेच्या सुमारास छापा टाकला असता तेथे पोलिसांना काही गोवंश जनावरे दोरीने बांधुन ठेवलेले, तसेच त्यांच्या चारापाण्याची सोय सुविधा नसल्याचे दिसुन आले.पोलिसांनी तेथून २ जर्शी गायींची सुटका केली. या कारवाईत राजु कदीर कुरेशी, आणि गुड्डु कदीर कुरेशी यांना ताब्यात घेतले.त्यांच्या विरुध्द कोतवाली पोलिस ठाण्यात भा. न्या. सं. २०२३ चे कलम २७१ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९७६ चे कलम ५ (क) ९ (अ) तसेच प्राण्याना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करणेबाबत अधिनियम १९६० चे कलम ११ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलीस अंमलदार संदीप पितळे, सुरज कदम, दिपक रोहकले, तानाजी पवार, संकेत धीवर, राहूल शिंदे यांनी केली.

## धार्मिक स्थळावरील भोंग्याचा आवाज कमी करण्यास सांगितल्याने वृद्धास शिवीगाळ धमकी

नगर – धार्मिक स्थळावरील भोंग्याचा आवाज कमी करा, आम्हाला त्रास होतोय असे म्हणाल्याचा राग आल्याने एकाने ७३ वर्षीय वृद्धास शिवीगाळ करून धमकी दिल्याची घटना बोल्हेगावच्या गांधीनगर येथे ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १.३० च्या सुमारास घडली. याबाबतची माहिती अशी की बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथील एका धार्मिक स्थळासमोर राहणाऱ्या बबन पोपट बुरकुले (वय ७३) यांना धार्मिक स्थळावर असलेल्या भोंग्याच्या आवाजाने त्रास होऊ लागल्याने त्यांनी मुक्तार हुसेन मलंग शेख (रा. मदिना मशीद समोर, गांधीनगर) यांना भोंग्याचा आवाज कमी करण्यास सांगितला. याचा राग आल्याने मुक्तार शेख यांनी आवाज कमी करणार नाही अशी म्हणून बुरकुले यांना शिवीगाळ करून धमकी दिली.

## भाऊसाहेब शिंदे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – पिंपळगावकौडा येथील रहिवासी भाऊसाहेब किसनराव शिंदे (वय ७४) यांचे ७ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर पिंपळगाव कौडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. विक्रम भाऊसाहेब शिंदे यांचे ते वडील होत.

## कमलबाई भंडारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – डोंगरगण येथील रहिवासी कमलबाई नेमीचंद भंडारी (वय ७०) यांचे ८ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर डोंगरगण (ता.आष्टी) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या नेमीचंद यांच्या पत्नी व महेश, योगेश यांच्या मातोश्री होत.

## सौ. रजनी सानम यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – नगर कल्याण रोडवरील आदर्शनगर मधील रहिवासी सौ. रजनी सुरेश सानम (वय ६४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अहिल्यानगर येथील अमरधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सौ. रजनी यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रेस फोटोग्राफर श्रीकांत वंगारी यांचे ते मावशी होत.

## सोपान सानप यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील श्रीरामपूर एज्युकेशन हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सोपान एकनाथ सानप (वय ८०) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, दोन मुले, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी नितीन सानप व सचिन सानप यांचे वडील, चंद्रकांत सानप यांचे धाकटे बंधू, डोंबिवली येथील उद्योजक संजय सानप यांचे चुलते होत.

# राजकीय पक्षाच्या नावावर रिक्षा चालकांना दमदाटी करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करा

### स्क्रॅप झालेले रिक्षा पूर्णतः बंद करा : जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन



राजकीय पक्षाच्या नावावर रिक्षा चालकांना दमदाटी करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करा अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले.

नगर – तारकपूर बस स्थानक येथील ऑटो रिक्षा चालकांच्या स्टॉप वर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचा ओबीसी सेलचा पदाधिकारी विनापरवाना स्क्रॅप रिक्षा चालक असून तो तारकपूर बस स्थानकाबाहेर रिक्षा लावून वाहतुकीला अडथळा करून व रिक्षा चालकांना शिवीगाळ करतो २ फेब्रुवारी रोजी परवानाधारक रिक्षा चालकांनी त्याच्या गाडीचा नंबर देऊन तक्रार केली होती. त्याची गाडी वाहतूक शाखेमध्ये ४ दिवस जप्त करून ठेवली होती त्याचा मनामध्ये राग धरून त्याने राजकीय पक्षाच्या नावे निवेदन देऊन तारकपूर येथील बेकायदेशीर स्टॉप आहे व तेथे महिलांची छेड काढली जाते दादागिरी केली जाते अशा बदनामीकारक निवेदन पोलीस अधीक्षकांना दिले. त्यामुळे प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या रिक्षा चालकांची बदनामी केलेली आहे व सदर रिक्षा चालकांची एकही तक्रार कोणत्याही महिलेने कोणत्याही पोलीस स्टेशनला दाखल केलेली नाही.

तारकपूर येथील परवानाधारक रिक्षा चालक हे सामाजिक उपक्रम राबवणारे सामाजिक कार्यकर्ते आहे. रक्तदान शिबिर घेणे, झाडे लावा झाडे जगवा तारकपूर बसस्थानक येथे दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पाणपोई चालवणे प्रवाशांच्या वस्तू रिक्षामध्ये राहिल्यास त्या पोलीस स्टेशनमध्ये देणे सर्वांनी मतदान करणे रिक्षांना पोस्टर लावून मतदारांना मतदानाचे आवाहन करणे असे सामाजिक उपक्रम राबवले जातात व सर्व रिक्षाचालक हे गुन्ह्यागोविंदाने प्रवाशांची सेवा करून आपले कुटुंबाचे पालन पोषण करीत आहे त्यामुळे अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळे समाजामध्ये बदनामी केली आहे.

सदर निवेदनाच्या आधारे हा स्क्रॅप रिक्षा चालक आम्हाला तारापूर स्टॅन्ड मध्ये येऊन तुम्हाला बघून घेईल अशी धमकी देतो व आमची बदनामी करतो व आमच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतो व या स्क्रॅप रिक्षाचालक याची गाडी ४ दिवस वाहतूक शाखेमध्ये ठेवून कशी सोडवली गेली याची सखोल चौकशी करण्यात यावी व त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी व शहरांमध्ये ज्या ज्या स्क्रॅप झालेल्या रिक्षा आहेत. त्या रिक्षा सर्वच रोडवर चालू आहे त्यामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे त्यामुळे स्क्रॅप रिक्षामुळे कधी अपघात होईल याचा नेम नाही अशा रिक्षांची शहानिशा करून त्या लवकरात लवकर रस्त्यावर चालू नये अशी कारवाई करण्यात यावी व प्रवाशांच्या जीविताचे संरक्षण करावे व अशा प्रकारच्या स्क्रॅप रिक्षा पूर्णपणे बंद करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक व निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सुधाकर साळवे, अशोक वैरागर, माजिद सय्यद, युसुफ शेख, सुलेमान शेख, संजीव लोंढे, कयूम सय्यद, बाळासाहेब साळवे, बाळासाहेब उमाप, विजय उमाप, अन्वर सय्यद, सादिक शेख, वहाब शेख, अनिल अवचिते, फारुख शेख आदींसह रिक्षाचालक उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर येथे वृक्ष दिंडी




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर येथे वृक्ष दिंडी काढण्यात आली.

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर येथे ग्रीन क्लब अंतर्गत वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही एम. जाधव, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.स्वाती वाघ, आय. क्यू.ए.सी. कोऑर्डिनेटर डॉ.आर.एच.शेख, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा.सागर कोहक, प्रा.राजेश गाडेकर, सर्व विभाग प्रमुख, ग्रीन क्लबचे सदस्य, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धनविषयी जनजागृती करण्यासाठी झाडे लावा झाडे जगवा अशा प्रकारच्या घोषणा देऊन संदेश देण्याचे काम केले. प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी एक झाड दत्तक घेऊन त्या झाडांची संवर्धन करणे व त्यांचे संगोपन करणे अशी सर्वांनी आश्वासन दिले. तसेच वृक्ष लागवड करताना झाडांना त्या प्राध्यापक व विद्यार्थी याचे नाव देण्यात आल्यामुळे सर्वांनी ग्रीन क्लब मार्फत त्याची जपण्याची शपथ घेतली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## उसने दिलेल्या पैशाची मागणी करत व्यावसायिकास जीवे मारण्याची धमकी

नगर – उसने दिलेल्या पैशाची मागणी करीत एकाने कापड व्यावसायिकास शिवीगाळ दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना ७ फेब्रुवारी रोजी शहरातील जुने सिव्हिल हॉस्पिटल समोर गुरुनानक मार्केट येथे घडली.

याबाबतची माहिती अशी की किरण बालाजी डहाळे (रा. जुने सिव्हिल हॉस्पिटल समोर, गुरुनानक मार्केट, अ.नगर ) यांचा मुलगा कुणाल याने त्याचा मित्र बजरंग नारायण मिश्रा (रा. तुळजाभवानी मंदिरा मागे, पाईपलाईन रोड, सावेडी, अ.नगर) यांच्याकडून तीन महिन्यापूर्वी तीन महिन्याच्या मुदतीवर ५० हजार रुपये उसने घेतले होते. त्या बदल्यात त्याच्याकडे सुझुकी कंपनीची क्सेस मोपेड (क्र.एम एच १६ डी डी ९६५३) ठेवली होती. ७ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास बजरंग मिश्रा हा डहाळे यांच्या घरी गेला व शिवीगाळ करीत त्यांच्या घराच्या दरवाजाला लाथा मारल्या. त्यावेळी किरण डहाळे यांनी तू उद्या दुकानावर येऊन कुणालची भेट घे. असे म्हटल्याचा मिश्रा यास राग आल्याने त्याने किरण डहाळे यांना शिवीगाळ करून, माझे पैसे मिळाले नाही तर मी तुम्हाला सोडणार नाही. जीवच ठार मारेल अशी धमकी देऊन निघून गेला.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी किरण डहाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बजरंग मिश्रा याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३३,३५१ (२), ३५२ अन्वये गुन्हाची नोंद केली.

# गृहिणी

## आरोग्य

### मखाणा खाण्याचे लाभ

मखाणा खाण्याचे अनेक फायदे आहेत. मखाना हा कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस, प्रथिने आणि जस्त यांसारख्या पौष्टिक घटकांनी समृद्ध असतो. बहुतेक लोकांसाठी दररोज १ ते १.५ कप (सुमारे ३०-५० ग्रॅम) मखाना खाणे आदर्श आहे. आयुर्वेदानुसार निरोगी व्यक्तीने दररोज फक्त १० ते १५ ग्रॅम मखाना खाणे आवश्यक आहे.

## पाककला

### बालूशाही

**साहित्य :** दोन वाट्या मैदा, अर्धी वाटी तूप, अर्धी वाटी आंबट दही, अर्धी चिमटी सोडा, पाकाकरिता साखर व तळण्याकरिता तूप.

**कृती :** मैद्यात अर्धी वाटी तूप, दही व सोडा घालून मैदा पाण्यात भिजवावा. अर्ध्या तासानंतर त्याच्या लहानशा लाडवा एवढ्या गोळ्या करून, त्या हाताने पेढ्यासारख्या चपट्या करून घ्याव्या. नंतर त्या गोळ्या तुपात तांबूस रंगावर मंद तळून काढाव्यात. नंतर साखरेचा पक्का पाक करून, त्यात त्या तळलेल्या गोळ्या घालून, चार-पाच मिनिटे ठेवाव्या व ताटाला तुपाचा हात लावून त्यात त्या काढून घ्याव्यात. पाक सुकला, म्हणजे बालूशाही तयार झाली. असे समजावे. २-३ दिवसांनी चांगल्या मुरल्यावर खाव्या.

## वास्तू

### वायव्येला काय असावे?

संगणक, दळणवळण तंत्रज्ञान, माहिती-तंत्रज्ञान व काही विशिष्ट प्रकारातील रसायनशास्त्र प्रयोगशाळा वायव्य किंवा अग्नेय भागात स्थापित करणे अत्यंत लाभदायी ठरते. स्टेशनरी व इतर आवश्यक वस्तूंची दुकाने वायव्य भागात असावीत. भिंतींना रंग पांढरा, क्रीम किंवा फिकट निळा असणे अतीउत्तम.

## सल्ला

कडुलिंबाच्या पानांचा रस प्यायल्याने पोट साफ राहते आणि ॲलर्जीची समस्या कधीच होत नाही.

## सौंदर्य

आठवड्यातून दोनदा केसांना तेलाने मसाज करावा व केसांच्या प्रकारानुसार सौम्य शॅम्पू निवडावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२५

**भीष्मद्वादशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, माघ शुक्लपक्ष, आर्द्रा १७।५३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. शब्दाने शब्द वाढेल. आर्थिक स्थितीत सुधारणा. व्यापार चांगला होत राहील.

**वृषभ :** गुंतवणूक विचारपूर्वक कराल. मित्रांबरोबर वेळ जाईल. नवे संबंध बनतील. मिळकतीतून लाभ प्राप्ति योग.

**मिथुन :** दृढ निश्चयामुळे कामात विजय मिळेल. मित्रांचा सहयोग मिळेल. धनलाभ होईल.

**कर्क :** विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन कराल. घरात मंगल कार्याचा योग. आर्थिक क्षेत्रात संयमाने वागाल.

**सिंह :** आहारावर विशेष लक्ष द्या. भूमि, वाहनामुळे लाभ होईल. आनंद वाटेल. मित्रांचा सहयोग मिळेल.

**कन्या :** आवडत्या छंदासाठी वेळ, पैसे खर्च कराल. तुमच्या सार्मर्थ्यात वाढ. आवास संबंधी समस्या सुटतील. व्यापार क्षेत्रात लाभ.

**तूळ :** आय-व्ययमध्ये संतुलन राहील. मानसिक अस्थिरता दूर होईल. आनंदाची बातमी कळेल.

**वृश्चिक :** व्यापार चांगला होत राहील. आनंददायी बातमी कळेल. घरातील व्यक्तिशी वाद होऊ शकतो.

**धनु :** निर्णय घेण्यात दुविधा राहील ज्यामुळे कामाची गति बाधित होऊ शकते. घरातील वातावरणामुळे मन प्रसन्न राहील.

**मकर :** आध्यात्मा संबंधी कामांमध्ये विशेष लाभ प्राप्ति योग. कौटुंबिक सुख लाभेल. भाग्यवर्धक यश.

**कुंभ :** जोडीदारा बरोबर तणाव निर्माण होईल. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये. मित्रांचा सहयोग मिळेल.

**मीन :** अधिकारांचा योग्य उपयोग करून घ्याल. मनावरील दडपण दूर. कार्यक्षेत्रात प्राप्ति योग.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### भूतकाळ

एक प्रियकर आपल्या प्रेयसिला सांगत होता 'लग्न करण्यापूर्वी माझी जी भूतकाळातील काही प्रेम प्रकरणं आहेत त्यांची कबुली देणं हे मी माझं कर्तव्य समजतो.'

'पण तुम्ही तर मला दोन आठवड्यापूर्वी त्याच्याबद्दल सांगितलं होतं ती म्हणाली.'


'प्रिये बरोबर आहे परंतु त्याला आता १५ दिवस होऊन गेले!'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ भारतीय डेटा परिषदेचे नवे सीईओ म्हणून कोणाची निवड केली आहे? - विनायक गोडसे

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७११० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१०९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) परंपरेने चालत आलेले ६) क्रोध; त्वेष ७) सायंकाळ; संध्याकाळ १०) दिवा लावण्यासाठी बनविलेली कापसाची सुरळी ११) राजस्थानातील एक भाग जेथील लोक व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत १३) पूर्ण भरतीची वेळ १५) मागे पाऊल; मागे सरणे १६) गाईचे दूध १७) एक समसंख्या; संवत्सरांची संख्या १८) समेट; तह; सलोखा; एक वेद १९) दया; करुणा २०) पट्टी; वर्गणी २१) उच्च जातीतील (समाजातील माणसे) २२) मेंढपाळ; घोंगडी तयार करणारा एक समाज

**उभे शब्द :-** १) समुद्र मर्यादा; अंत २) मौज; मजा ३) भरीव नसलेला; पोकळ; रिता ४) कागदाचे कापलेले बारीक तुकडे ५) क्रीडा; लीला ८) गव्हाचे कणीदार पीठ ९) काहीसा वेडा; खुळचट १२) नुकताच; आताच; पावसाचे एक नक्षत्र १४) उदाहरणादाखल; नमुन्यास घेण्यासारखे १५) पिण्याचे पाणी थंड करण्याचे मातीचे भांडे १६) अनेक पाय असलेला एक कीटक १७) प्रयत्न; खटपट; प्रयास १८) दक्ष; सजग; हुशार १९) ऐकण्याचे इंद्रिय; कान २०) दातांत धरून वाजविण्याचे एक पोलादी वाद्य; पण; प्रतिज्ञा

# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आईची ममता ही सागरापेक्षाही अथांग असते व आकाशापेक्षाही विशाल असते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### वनस्पती देखील मांसाहारी असतात का?

होय, वनस्पती मांसाहारी असतात. जरी त्या कीटकांपेक्षा मोठ्या प्राण्यांना खात नसल्या तरी कीटकसुद्धा प्राणिसृष्टीचेच घटक आहेत. म्हणजेच काही वनस्पती तरी मांसाहारी आहेत.

मांसाहारी वनस्पती त्यांचे भक्ष्य निरनिराळ्या पद्धतींनी पकडतात. घटपर्णीची पाने एखाद्या घटासारखी किंवा नळीसारखी असतात. त्यात पाणी असते. घटाच्या आतील बाजूस केसाळ आवरण असते. कीटक त्यात अडकला की तो अधिकाधिक गुरफटत जातो आणि घसरत जाऊन घटातील पाण्यात बुडतो.

दवबिंदू वनस्पतीची पाने गोल असतात. त्यावर केसाळ प्रवर्ध असतात. या केसांच्या टोकाशी चिकट पदार्थाचा थेंब असतो. कीटक या चिकट पदार्थामुळे पानाला चिकटतो व त्यामुळे तो निसटू शकत नाही. त्याचवेळी दवबिंदूंची पाने आतल्या बाजूला वळतात आणि ती कीटक पकडून खातात.

'व्हीनसचा फ्लाय ट्रॅप' ही प्रसिद्ध मांसाहारी वनस्पती आहे. यथायोग्य नाव असलेली ही बहुधा सर्वात जास्त प्रसिद्ध वनस्पती आहे. या वनस्पतीला बिजागरासारखी पाने असून त्यांच्या पृष्ठभागावरही केस असतात. या पानांवर विशेषत: संवेदनशील केसांवर - कीटक बसतो तेव्हा पाने मिटतात आणि कीटक आत पकडला जातो.

### गर्विष्ठ मेणबत्ती

एकदा एका गृहस्थाने आपल्या मित्रांना मेजवानीसाठी बोलाविले होते. सगळेजण दिवाणखान्यात एका मोठ्या मेणबत्तीच्या प्रकाशात जेवत होते, ते पाहून मेणबत्तीला स्वत:चा अभिमान वाटला, आपल्या प्रकाशाचा केवढा उपयोग आहे असे वाटून ती गर्वाने म्हणाली, ''ज्या वेळी व ज्या ठिकाणी सूर्यचंद्राचा प्रकाश पोहोचू शकत नाही. त्यावेळी व त्या स्थळी माझा प्रकाश पडू शकतो, चंद्रसूर्यही माझ्यापुढेही क्षुद्र वाटतात.'' तिचे हे गर्वाचे बोलणे ऐकून जेवणारी मंडळी हसली. त्यातला एक जण उठला. त्याने खिडकी उघडली. त्याबरोबर हवेची झुळूक आली व मेणबत्ती विझली. नंतर त्याने पुन्हा खिडकी बंद केली व मेणबत्ती पेटविली. मग तो गृहस्थ मेणबत्तीला म्हणाला, ''अगं वेडे आता तरी प्रकाश दे, एवढ्याशा झुळकेने विझतेस, चंद्रसूर्याला क्षुद्र समजतेस त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची मिजास करतेस. चंद्रसूर्य कधी तुझ्यासारखे वाऱ्याच्या झुळकेने विझून गेले आहेत का?'

तात्पर्य : कोणाशी तुलना करण्यापेक्षा आपल्यावर सोपवलेली कामगिरी व्यवस्थितपणे पार पाडण्यातच मोठेपण आहे.

## रहमते दर्शन (भाग - १)



तेरा कोटि-कोटि धन्यवाद, जो तू निरंतर अपने जीवों की रक्षा किसी न किसी तरह करता रहता है।

### निपुण चिकित्सक

दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज के जीवन का लक्ष्य ही दया-मेहर करना था। जो लोग उनके पास रोते हुए जाते थे, वो आते हुए खुशी-खुशी घर लौटते थे। मेरे साथ भी ऐसी ही घटना हुई। मैं काफी समय से दमे से पीड़ित थी।

### महाराज जी द्वारा मेरे पोते की रक्षा

कुछ दिन तो ऐसे ही निकल गये। इसके पश्चात काफी उपचार आदि किये, परन्तु कोई भी आराम नहीं आया। दमा इस हद तक पहुँच गया कि मेरा साँस तक लेना दूभर हो गया। अब डॉक्टरों ने भी जवाब दे दिया और कहा कि यह बीमारी अब लाइलाज हो गई है और ये चंद दिनों की मेहमान है ।

एक दिन महाराज जी की दया मेहर से उनके पास जाने का ख़्याल आया। मैं अपने पति के साथ महाराज जी के पास उनकी पुरानी कोठी में जा पहुँची। शाम करीब ७ बजे का समय था। जैसे ही महाराज जी मेरे सम्मुख आये, मैं फूट-फूट कर रोने लगी और उनके पैरों में गिर कर प्राणों की भीख माँगने लगी। महाराज जी अति दयावान थे। उन्होंने मुझे उठाया, ढाढ़स बँधाया और आँखों आँखों में मुझ पर दया की वर्षा करने लगे।

इसके पश्चात महाराज जी ने माता जी को 'भजन' कह कर आवाज़ दी और एक-एक गिलास काँजी लाने को कहा। हालाँकि इस

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

बच्चा माता-पिता या किसी अन्य पर हाथ उठाने लगा है। बच्चा गलत भाषा का इस्तेमाल करने लगा है। बच्चा खुद को अक्सर बीमार बताता है।

यह सारे दुर्गण बच्चे के नहीं हैं। यह दुर्गण उसे घर के सदस्यों से प्राप्त हुए हैं। बुरा व्यवहार बदला जा सकता है उसके लिए जरूरी है। प्यार। बच्चों में बुरा व्यवहार किसी न किसी कारणवश होता है। आप उसकी गलती पर ध्यान केंद्रित न कर के उसका ध्यान कहीं और अच्छे कार्य में लगाएंगे तो परिणाम बेहतर होगा और उसका बुरा व्यवहार भी बदल जायेगा। जब मां बाप बिना सोचे समझे बच्चे को अपमानित करते हैं तो बच्चे मां-बाप को भला बुरा कहने में जरा भी नहीं डरते और न ही उनकी कोई बात सुनते हैं। यदि बच्चे ने ऐसा व्यवहार किया है जिससे आपको शर्मसार होना पड़ रहा है तो

### दिमाग की शक्ती

आपको एक अच्छे माता-पिता का रोल निभाते हुए उन्हें समझाने की जरूरत है।

बच्चों को अनुशासन सिखाना बहुत जरूरी है। जब एक बच्चे को कुछ समझ नहीं आता तो वह अनुचित करता है क्योंकि उसके कार्य करने से पहले सोचने की क्षमता अस्थायी तौर पर चली जाती है। जिन माता-पिता और बच्चों में कम्यूनिकेशन गैप, माता-पिता की ओर से जरूरत से ज्यादा दबाव, घर में सही माहौल न होना, अस्वस्थ खान-पान, शिष्टाचार और मूल्यों का अभाव, इंटरनेट का अत्यधिक उपयोग करते हैं वह बच्चे अनुचित करने में देर नहीं करते। बच्चों में अवगुण आने का मुख्य कारण यह है कि घर के सदस्य हर समय बच्चे के बारे में नकारात्मक सोचते रहते हैं । नकारात्मक विचार बच्चे को अवगुण धारण करने के लिए प्रेरित करता है। अगर घर के सभी सदस्य और विशेषतौर पर मां बाप बच्चे के लिए भगवान को याद करें और बच्चे को कल्पना में देखते हुए भगवान को कहें कि भगवान आप प्यार के सागर हैं। आप का यह शुभ संकल्प भगवान की शक्ति से बच्चे को बदल देगा। यह अभ्यास कम से कम ३ घंटे हर रोज करना है। बच्चे को मन से प्यार देना है और प्यार से ही समझाना है। सभी मां बाप को बच्चों के लिए ऐसा अभ्यास नए संसार की स्थापना के लिए करना है। व्यवहार से संसार परिवर्तन कभी कभी हमारे शब्द लोगों को हम से दूर करने लगते हैं,

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'झाकिरजी...'

कुछ रिश्ते जिंदगी अमीर बना देते है । ह्या ठिकाणी 'अमीर' हा शब्द 'श्रीमंती'शी निगडित नाही. खरं तर काही व्यक्तींसोबत आपलं रक्ताचं नातं नसतं. एवढंच नाही तर त्या व्यक्तीची भेटही झालेली नसते. पण त्या व्यक्तीमध्ये असलेले कलागुण, त्याची आवड - छंद, त्यांचे ऐकलेले विचार, त्यांच्याविषयीची माहिती, ह्यावरुन आपलं, त्यांच्यासोबतचं नातं जोडलं जातं. आपल्याला त्या व्यक्तीला भेटावसं वाटतं. त्यांच्यातले कलागुण मनापासून पाहावेत, ऐकावेत असं वाटतं. आणि मग आपल्यालाही, त्यांनी जे आत्मसात केलं ते आपणही आत्मसात करावं असं मनापासून वाटतं. काहीजण तसा प्रयत्न करतात, त्यात यशस्वीही होतात.

माझ्या लहानपणी 'ताजमहाल चहा' ची जाहिरात दूरदर्शनवर पहायचो 'वाह उस्ताद' ही आदरणीय झाकिर हुसेनजींची जाहिरात पाहायचो. तबला वाजवणारे झाकिरजी दूरदर्शवर पाहायला मिळायचे. आनंद व्हायचा. त्याचवेळी मला वाद्याची आवड निर्माण झाली असं आज लक्षात येतं. त्यानंतर काही वर्षांनी तबला शिकावं असं मनापासून वाटु लागलं. युट्युबवर झाकिरजींचे सोलो तबला वादनाचे व्हिडीओज पाहिले अगदी तल्लीन होऊन. आपणं निवडलेल्या क्षेत्रात टॉपवर जायचं असेल तर झाकिरजींसारखं समर्पण, जिगर असणं गरजेचं आहे. तबला, तबल्यावर लिलया फिरणारी झाकिरजींची बोटं, त्यांची तबला वाजवतांनाची तल्लिनता.... सारं अगदी देहभान हरपुन पाहायचो. आधी 'कानसेन' होणं गरजेचं आहे हे प्रकर्षाने लक्षात आलं. आयुष्यभर तबल्याला आपलं सर्वस्व मानणारे, तबला वाजवणं हाच ध्यास आणि श्वास असलेले, अथक परिश्रम घेऊन आत्मसात केलेल्या कलेवर मनापासून ममत्व असणारे, हातांच्या बोटांचे मनापासून ऋण व्यक्त करणारे, अनेक मैफलीत संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणारे झाकिरजी आज आपल्यात नाहीत, हे कुणीही स्वीकारणार नाही, स्वीकारु शकणार नाही. झाकिरजींना कधीही भेटलो नाही पण झाकिरजींना युट्युबवर अधुन मधुन पाहातो. त्यांचं सोलो तबला वादन अगदी शंभर टक्के एकाग्रतेनं पाहातो, ऐकतो. झाकिरजींना, त्यांच्यातल्या कलाकाराला, त्यांनी आत्मसात केलेल्या कलेला मनापासून सलाम करतो. प्रॅक्टीस मेक्स मॅन परफेक्ट.

असंख्य चाहत्यांसाठी प्रेरणादायी असणारं व्यक्तिमत्व झाकिरजी झाकिरजी, तबल्यावर तुमची फिरणारी बोटं, तबला वाजवतांना तुमच्या डोळ्यांतले भाव बरंच काही सांगतात. माझ्यासारख्या चाहत्यांच्या मनात कलेविषयीची आवड निर्माण करतात. तुमचं, युट्युबवरील सोलो तबला वादन पाहाणं, ऐकणं ह्यासारख्या दुसरा आनंद असुच शकणार नाही. झाकिरजी, आज तुम नही हो लेकिन युट्युब के माध्यमसे आपको मिलता हुँ, मिलताही रहुँगा । जे क्षेत्र निवडलं त्यात 'बाप' व्हायचं असेल तर तुमचं तबला वाजवणं पाहिलं तर ती जिगर, आमच्यात निर्माण होते. तुम्ही आयुष्यभर वाजवलेला तबलाही आज अनाथ झाला आहे. तबल्याला बोलता येत असतं तर तुमच्या सगळ्या आठवणी, आमच्यापर्यंत पोहोचल्या असत्या. तुमच्या ममत्वाचा स्पर्श आज, तबल्याला होणारा नाही म्हणून तबला दुःखी आहे. तुमच्या बोटांमधील जादुई ममत्व तबल्याला आता अनुभवता येणार नाही. ज्या रसिकांनी तुमची मैफल पाहिली, ऐकली, त्यांना, तुमच्या मैफलीच्या आठवणींनी आपलसं केलं असेल. खरंच, तुमची मैफल पहाणं, ऐकणं हे आनंद होतं, सुख होतं, जगणं समृध्द करणार होतं. आज तबल्याकडं पाहिलं की 'उस्ताद', तुमची आठवण आल्याशिवाय राहात नाही.

शब्द कितीही सामर्थ्यवान असले तरी ते मनातल्या सगळ्या भावना व्यक्त करतीलच असं नाही. तुम्ही, तबला आणि तबल्यावर तुमची लिलया फिरणारी बोटं, तबला वाजवतांनाची तुमची तल्लीनता, आम्हा रसिकांना, संगीतप्रेमींना जीवनाचा अर्थ सांगणारी आहे, प्रेरणादायी आहे. तुम्हाला प्रत्यक्षात तबला वाजवतांना कधीच पाहता आलं नाही हे नक्कीच माझ्यासाठी दुर्देवी आहे. तुमच्या विषयीची माहितीचं वाचन, युट्युबवरील तुमचं तबला वादन... ह्यामुळे तुमच्या सोबत जवळकीचं नातं निर्माण झालं. जे अतुट असणार आहे. कोणतंही एक वाद्य शिकुन झाकिरजी, माझ्यात उतरवण्याचा प्रयत्न करणार आहे.

(लेख क्र.५३६)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### नवजात बालकाची परिचर्या

बालकाला दूधी भोपळा, कोथिंबीर, तांबडा भोपळा, गाजर, बीट यांपैकी एक किंवा दोन भाज्या उकडून नंतर गाळणीतून गाळून घेऊन त्याला वस्त्रगाळ जिऱ्याची पूड, मीठ व तुपाची फोडणी द्यावी व सूप तयार करून बाळाला पाजावे.

**तांदूळ व मुगाची पेज :** दोन वाट्या तांदूळ व १ वाटी मुगाची डाळ धुऊन वाळवावी. वाळवल्यानंतर १ चमचा तुपामध्ये भाजावी. भाजल्यानंतर ते मिश्रण मिक्सरमधून बारीक करून घ्यावे व डब्यामध्ये भरून ठेवावे. ज्या वेळेस गरज वाटेल त्या वेळेस १ ते २ चमचे हे मिश्रण पाण्यामध्ये शिजवावे. त्याला वस्त्रगाळ जिरेपूड, मीठ व तुपाची फोडणी द्यावी. गाळणीतून गाळून घेऊन ते बाळाला पाजावे. वरील सर्व पदार्थ हे बाळाला अर्धा ते एक वाटी या प्रमाणात द्यावेत. हळूहळू बाळाच्या वाढत्या भुकेचा अंदाज बघून बाळाचा आहार वाढवावा.

**१० ते १२ महिन्याच्या बालकांसाठी आहार :** या काळामध्ये साधारणत: बाळाला दात यायला सुरुवात झालेली असते; त्यामुळे आहारातील द्रव भाग कमी करून थोडा घन भाग वाढविण्यास हरकत नाही. बालकाला या काळात पदार्थ गाळणीने गाळून घेण्याची गरज नसते. फक्त मिक्सरमधून बारीक करून घ्यावेत. बालकाला पिकलेले मऊ केळ भरवावे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइनमध्ये काय फरक आहे?

**महत्त्वाचा प्रश्न : आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइनमधील नेमका फरक काय?**


खरंतर, हा एक अशा प्रश्नांपैकी आहे जो लोक विचारू इच्छितात पण कधीही विचारत नाहीत, कारण त्यांना हा प्रश्न कसा विचारावा हे माहित नसते किंवा ते विचारल्यास ते हास्यास्पद दिसण्याची भीती असते. परंतु काळजी करू नका. याविषयी कोणतेही हास्यास्पद प्रश्न नाहीत, कारण हा विषय खूप गोंधळाचा आहे.

आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइन यांचे वेगळे परंतु संबंधित क्षेत्र एकत्रितपणे सरावले जातात. डिझाइन प्रक्रिया दोन्ही मार्गांसाठी समान असते. या क्षेत्रात असे वास्तुविशारद आहेत जे फक्त आर्किटेक्चरल डिझाइन करतात, तसेच असे इंटेरियर डिझाइन करणारे डिझाइनर आहेत जे फिनिशेस आणि फर्निचरची निवड करतात. त्याचप्रमाणे काही लोक दोन्ही करतात आणि दोन्ही क्षेत्रांमध्ये काम करतात. यामुळे एक असा प्रकल्प

तयार होतो जो एकसंध आणि समरसतेने भरलेला असतो. पण पुन्हा, आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइन यामध्ये काय फरक आहे?

याचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करते मी स्पष्टतेचे आश्वासन देऊ शकत नाही, पण काही मुद्दे स्पष्ट करण्याचा मी नक्कीच प्रयत्न करेन. सर्वात साध्या शब्दांत सांगायचे झाले तर, जेव्हा आपण एका वास्तुविशारदाला नियुक्त करता, तेव्हा तो फक्त जागेच्या रूपरेषांवरच नाही तर त्या मोठ्या चित्रावर देखील लक्ष केंद्रित करतो. यामध्ये जीवन सुरक्षा, अभियंता, बाह्य साहित्य, आणि मोठ्या कोड संबंधित प्रश्नांचा समावेश असतो. एका घरासाठी, याचा अर्थ म्हणजे घराचे बाह्य रूप, घराची ऊर्जा कार्यप्रदर्शन, बांधकाम परवाने आणि सहसा इंटेरियर केसवर्क आणि कॅबिनेट कसे मांडले जातात हे तपासणे.

जेव्हा आपण एक इंटेरियर डिझायनर नियुक्त करता, तेव्हा तो किंवा ती प्रकल्पातील त्या भागांची देखरेख करणार असतो जे इंटेरियर सौंदर्य आणि कार्यक्षमता कशी दिसतात हे संबोधित करतात. यामध्ये इंटेरियर फिनिशेस (टाईल, हार्डवुड, कार्पेट्स, वॉलपेपर) निवडणे, तसेच फर्निचर आणि सौम्य वस्त्र (उशा, ॲक्सेसरीज, इत्यादी) निवडणे समाविष्ट असू शकते. आदर्शरित्या, आर्किटेक्चरलकारासह जागेच्या लेआउटवर काम करणे आवश्यक आहे तसेच कॅबिनेट्स, फर्निचर आणि इतर विचारलेल्या गोष्टी कशा कार्य करतात हे तपासणे. यामुळे दरवाजे योग्य ठिकाणी ठेवले जातात, खोलीचे आकार योग्य ठेवले जातात आणि संपूर्ण जागा एकसंध आणि सामंजस्यपूर्ण अनुभव प्रदान करते.




शेजारील आकृतीत मध्यभागी गडद भाग अथवा दोघांचा कॉमन भाग आहे जिथे अनेक वेळा वास्तुविशारद आणि इंटेरियर डिझायनर दोघेही समान सेवा करतात. यामध्ये इंटेरियर फिनिशेसचा समावेश आहे, जसे की टाईल आणि लाकडी काम, इंटेरियर उंची आणि तपशीलांच्या रेखाटनाची निर्मिती आणि फर्निचर मांडणीसाठी जागा योजना.

जेव्हा आपण सध्याच्या खोलीत उभे आहात, तेव्हा आपल्याला कल्पना येईल की एका जागेचे नियोजन करताना बरेच निर्णय घेणे आवश्यक आहे. जसे की खिडक्या कुठे ठेवाव्यात ते सोफ्यावर असलेली उशी निवडण्यापासून, या सर्व निर्णयांची आवश्यकता असते विशेषतः एका कुटुंबातील घरांमध्ये. डिझायनर ची प्रक्रिया साधारणतः 'आला कार्ट' प्रमाणे असते, कारण अनेक ग्राहकांच्या प्रक्रियेत भिन्न रुची असते.



काही ग्राहक डिझायनरला प्रत्येक निर्णय घेण्यासाठी नियुक्त करतात, तर काही खूप इच्छित असतात की इंटेरियर फिनिशेस आणि फर्निचरच्या निवडीमध्ये तेच मुख्य असावेत. शेवटी एक उत्कृष्ट तयार उत्पादन मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे ही डिझायनरची जबाबदारी आहे.

**आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइन : एकत्रित निर्माण करण्याचे महत्त्व**

आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइन कसे एकत्र काम करतात.

आर्किटेक्चरल डिझाइन आणि इंटेरियर डिझाइन ही दोन एकमेकांशी निगडीत असलेली शिस्त आहे जी कार्यक्षम, आकर्षक आणि सुसंवादी जागा निर्माण करण्यासाठी एकत्र काम करतात. त्यांचा वेगळा दृष्टिकोन असला तरी, ते एकमेकांवर अवलंबून असतात ज्यामुळे जागा फक्त दृश्यदृष्ट्या आकर्षकच नाही तर ती कार्यक्षम आणि आरामदायक देखील बनते. ते एकमेकांना कसे पूरक आणि सुधारतात हे पाहा :

**१. पाया आणि कार्यक्षमता**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** हे इमारतीचे पायाभूत किंवा रचनात्मक घटक आहे यामध्ये घराची रचना, आकार, दरवाजे, खिडक्या आणि भिंतींचे ठिकाण निश्चित केले जाते. स्थापत्यशास्त्र जागेच्या सीमा आणि एकूण संरचनेसाठी मार्गदर्शक असते.

इंटेरियर डिझाइन : एकदा आर्किटेक्चरल शेल असले की, इंटेरियर डिझाइन त्याच्या आतील भागाला कार्यक्षम आणि दृश्यदृष्ट्या आकर्षक बनवण्यावर लक्ष केंद्रित करते. यामध्ये सामग्री, रंग, फर्निचर, प्रकाश, आणि सजावटचा समावेश होतो जो त्या जागेच्या उद्देशाशी अनुरूप असतो जसे की निवासी, व्यावसायिक, किंवा औद्योगिक.

**२. प्रवाह आणि संतुलन निर्माण करणे**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** आर्किटेक्ट्स स्पॅटिअल फ्लोची योजना बनवतात, ज्यामुळे खोल्या एकसारख्या आणि तार्किक पद्धतीने जोडलेल्या असतात. ते विचार करतात की एक जागा दुसऱ्या जागेशी कशी जोडली जाते आणि संपूर्ण इमारतीत हालचालींचा प्रवाह कसा असावा.

**इंटेरियर डिझाइन :** इंटेरियर डिझाइनर या स्पॅटिअल फ्लोला चांगल्या प्रकारे वाढवतात, लेआउटच्या निवडी, फर्निचरच्या व्यवस्था आणि सजावटीच्या घटकांद्वारे ते या सुनिश्चित करतात की जागा एकसारखी आणि आमंत्रण देणारी वाटते आणि ते आर्किटेक्चरल डिझाइनशी सुसंगत असलेल्या गोष्टी निवडून एकत्रित करतात.

**३. सौंदर्यात्मक सुसंगती**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** बाह्य आणि इंटेरियर डिझाइन शैली जुळणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे एकसारखा सौंदर्यात्मक अनुभव निर्माण होतो. आर्किटेक्ट्स शैली, साहित्य, आणि संरचनेच्या रूपाशी संबंधित टोन सेट करतात.

**इंटेरियर डिझाइन :** इंटेरियर डिझाइनर हा विषय घराच्या आतील भागात चालू ठेवतात. ते सुनिश्चित करतात की घरातील रंग, बनावट आणि फर्निचर आर्किटेक्चरल डिझाइनशी अनुरूप असतात, जरी ते आधुनिक, पारंपारिक, मिनिमलिस्ट किंवा इकोलॅक्टिक असो, जर आर्किटेक्चरलशास्त्र आणि इंटेरियर डिझाइन एकमेकांशी जुळत नसतील तर जागा विसंगत आणि विकृत वाटू शकते.

**४. जागेचा आणि कार्यक्षमतेचा अधिकतम उपयोग**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** आर्किटेक्ट्स जागेची रचना विचारपूर्वक तयार करतात, जेथे किती खोल्या, खिडक्या, प्रवेशद्वार आणि सुरक्षा वैशिष्ट्ये आवश्यक आहेत हे विचारले जाते. इंटेरियर डिझाइन: इंटेरियर डिझाइनर या जागेच्या कार्यक्षमतेचा अधिकतम उपयोग करण्यासाठी फर्निचर आणि अन्य घटक यांची निवड करतात. उदाहरणार्थ एक ओपन-प्लान लिव्हिंग रूम फर्निचरच्या योग्य निवडीने नैतिक क्षेत्र तयार करू शकतो, जो प्रकाश किंवा हालचालीला अडथळा न करता.

**५. प्रकाश आणि वातावरण**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** खिडक्या, दरवाजे आणि स्कायलाईट्स यांचे ठिकाण नैतिक प्रकाश आणि इमारतीच्या वातावरणावर प्रभाव टाकते.

**इंटेरियर डिझाइन :** इंटेरियर डिझाइनर यामध्ये कृत्रिम प्रकाशाचा वापर करतात, जसे की लॅम्प्स, चांदणी किंवा स्पॉटलाइट्स. ते प्रकाशाचा खेळ करून मूड तयार करतात, आर्किटेक्चरल वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतात, किंवा खोलीतील विशिष्ट घटकांना आकर्षित करतात.

**६. समस्या सोडवणे**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** आर्किटेक्ट्स प्रायः संरचनात्मक अखंडता, जागेचा वापर आणि सौंदर्यात्मक एकात्मता यांचे प्रॅक्टिकल समस्यांचे निराकरण करतात.

**इंटेरियर डिझाइन :** एकदा आर्किटेक्ट्स संरचना पुरवतात, तेव्हा इंटेरियर डिझाइनर आराम, उपयोगिता, आणि वैयक्तिक शैलीशी संबंधित आव्हानांचा सामना करतात. ते कधीकधी असामान्य जागा किंवा संरचनात्मक घटकांसोबत (उदा. बीम किंवा स्तंभ) काम करतात आणि त्यांना कार्यक्षम आणि दृश्यदृष्ट्या सुसंगत बनवतात.

**७. अनुभव निर्माण करणे**

**आर्किटेक्चरल डिझाइन :** आर्किटेक्चरल डिझाइन त्याठिकाणी प्रवेश केल्यावर एक प्रारंभिक अनुभव सेट करते. ते मापदंड, प्रमाण आणि स्पॅटिअल गुणधर्म निश्चित करतात.

**इंटेरियर डिझाइन :** इंटेरियर डिझाइन हा अनुभव वाढवतो, जागेला आमंत्रण देणारे, आरामदायक आणि वापरकर्त्यांच्या आवश्यकतेनुसार अनुकूल बनवते. रंग, बनावट आणि डिझाइनच्या माध्यमातून, इंटेरियर डिझाइनर एक स्वागतार्ह वातावरण तयार करण्यात मदत करतात.

**निष्कर्ष**

इंटेरियर डिझाइन हा इमारत डिझाइन प्रक्रियेचा अविभाज्य भाग असावा कारण त्याचा थेट प्रभाव जागेच्या कार्यक्षमता, आराम दायकता आणि सौंदर्यशास्त्रावर पडतो. ज्या वेळी आर्किटेक्चरल डिझाइन संरचना, लेआउट आणि एकूण रूपरेषेवर लक्ष केंद्रित करते, तेव्हा इंटेरियर डिझाइन हे सुनिश्चित करते की हे सर्व घटक प्रभावीपणे वापरून एक सुसंवादी आणि उपयोगी वातावरण तयार केले जाईल. हे प्रकाशयोजना, फर्निचरची व्यवस्था, रंगसंगती आणि सामग्रीच्या निवडीसारख्या घटकांचा विचार करते, जे जागेला केवळ सौंदर्यदृष्ट्या आकर्षक बनविण्यासाठी नाही, तर वापरकर्त्यांसाठी कार्यक्षम आणि आरामदायक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण असतात. प्रारंभापासूनच इंटेरियर डिझाइन समाविष्ट केल्यास, अंतिम जागा रूप आणि कार्यक्षमता यांचा एकसंध मिश्रण बनते, ज्यामुळे त्या जागेतील रहिवाशांच्या गरजा पूर्ण होतात आणि त्यांचा अनुभव सुधार होतो.

SKA **डिझाइन स्टुडिओ विषयी थोडक्यात :** SKA डिझाइन स्टुडिओ हे एक आर्किटेक्चर आणि इंटेरियर डिझाइन फर्म आहे. आमचे कार्यालय अहिल्यानगरमध्ये आहे, परंतु आम्ही संपूर्ण भारतभर काम करतो. आमचे सध्या चालू असलेले काम मुंबई, पुणे, अहिल्यानगर आणि गोव्यात आहेत. आमचे काम रेसिडेंशियल, कमर्शियल, कॉर्पोरेट, हॉस्पिटॅलिटी आणि इंडस्ट्रियलप्रोजेक्ट्सपर्यंत विस्तृत आहे.

"As an architect, you design for the present with an awareness of the past for a future which is essentially unknown."
NORMAN FOSTER

Architecture is just art we live in.



- Ar. ShraddhaAndure
B.Arch
Principal Architect
SKA DESIGN STUDIO
B15, Kohinoor Plaza,
PatrakarChowk, Ahilyanagar
9975595234
shraddha.skaa@gmail.com

RAJENDRA BHAGAT & ASSOCIATES
CONSULTING STRUCTURAL ENGINEERS
OFFICE: SHOP NO 2, HANUMAN CHAMBERS,SARJEPURA, AHILYANAGAR , MOBILE NO 8149816198

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA



श्री बाणेश्वर महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

# निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे श्री बाणेश्वर महाविद्यालयात उद्घाटन

नगर - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळ व श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे ६ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाचे संचालक अक्षय कर्डीले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव, प्राचार्य हापसे, बी.एड. कॉलेजचे शिर्के, माजी विद्यार्थी आणि तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

उद्घाटक म्हणून लाभलेले अक्षय कर्डीले यांनी विद्यार्थीनींना निर्भय कन्या याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख व्याख्याते म्हणून लाभलेल्या ॲडव्होकेट जबीना शेख यांनी स्त्रीसंरक्षण कायदेविषयक माहिती दिली. तसेच डॉ. मनिषा पुंडे यांनी देखील मुलींना स्वसंरक्षणासाठी काय केले पाहिजे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले व सोबत प्रात्यक्षिक करून दाखवले.

सूत्रसंचालन डॉ.वाघ स्वाती यांनी केले.आभार प्रा. दिवटे धनश्री यांनी मानले. यावेळी प्राचार्य डॉ. जाधव व्ही. एम., विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. शिंदे ऋषिकेश, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# जिजाऊ ब्रिगेडचे दुबई येथे दुसरे जागतिक अधिवेशन



अखिल भारतीय मराठा सेवा संघ प्रणित आंतरराष्ट्रीय जिजाऊ ब्रिगेडच्या दुसऱ्या जागतिक अधिवेशनाचे २५ जानेवारी रोजी दुबई येथे उत्साहात पार पडले.

नगर - अखिल भारतीय मराठा सेवा संघ प्रणित आंतरराष्ट्रीय जिजाऊ ब्रिगेडच्या दुसऱ्या जागतिक अधिवेशनाचे २५ जानेवारी रोजी दुबई येथे उत्साहात पार पडले अशी माहिती राष्ट्रीय कार्याध्यक्ष इंजिनियर सुजाताताई ठुबे यांनी दिली.

या अधिवेशनाचे उद्घाटन दुबई स्थित ग्लोबल मार्केटच्या संचालिका जुई सुर्वे कदम व हरिपट वॉट युनिव्हर्सिटीच्या डायरेक्टर वृषाली म्हात्रे यांनी केले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्षा मयुराताई देशमुख या होत्या.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना जुई सुर्वे म्हणाल्या की, धावपळीच्या युगामध्ये महिलांनी बदल घडून आणावा. ज्या महिला नोकरीत नाहीत त्यांनी एकत्र येऊन छोटा व्यवसाय सुरू करावा. हळूहळू तो व्यवसाय वाढेल आणि आपली सामाजिक प्रगती होईल, ही भावना ठेवली पाहिजे. आज महिला एकत्र येऊन अशी संघटना उभी करतात त्यातून ऋणानुबंध जुळतात त्याचा निश्चितच समाजाला फायदा होतो.

अध्यक्षपदावरून बोलताना देशमुख म्हणाल्या की, जिजाऊ ब्रिगेडचे ध्येयधोरणे सामाजिक उन्नती व आर्थिक उन्नती कशी करता येईल याकडेच आमचे लक्ष आहे. महिलांनी फक्त चूल आणि मूल या पुरत सीमित न राहता थोडं बाहेर पडून जगलं पाहिजे, म्हणजे त्यांना जगाची कल्पना येते. पहिला अधिवेशन थायलंड येथे झाले. दुसऱ्या अधिवेशन दुबई येथे होत आहे, तिसऱ्या अधिवेशन मॉरिशस येथे घेण्याचे प्रयोजन आहे. अनेक देशातून मागणी येत आहे.

यावेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अमृत महोत्सव सोहळा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राथमिक स्वरूपात त्यांच्या भगिनी सत्यभामाताई पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी दुबई येथील स्थानिक युवतींनी ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले तसेच मिलिंद मानके यांच्या शिवगंगायनाने व लहान मुलांच्या नृत्य नाटकेने सर्वांची मने जिंकली. यावेळी महासचिव वनिता अरबट, दुबईच्या अध्यक्षा सुनीताताई देशमुख, वैशाली वायाळ, शारदा जाधव, अनुराजे भोसले, प्राचार्य संयुक्त देशमुख, वंदनाताई घोगरे, अनुराधा आढाव, संपूर्णा सावंत, नेदरलँड येथील शिवव्याख्याते राजेश कोकडे उपस्थित होत्या. या अधिवेशनात दोन ठराव मांडण्यात आले त्यात भारत सरकार मार्फत दिल्ली येथे राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेबांचा मोठा पुतळा उभा करण्यात यावा व दुबई येथे जिजाऊ स्मारक व वाचनालय उभे करण्यात यावे. यावेळी वैशाली वायाळ यांनी संपादित केलेल्या स्त्री शक्तीचा जागतिक सन्मान या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. सदर अधिवेशन यशस्वी करण्यासाठी प्रियंका भोसले, आदिती सोनार, अनघा आवटे, दिपाली पवार, सुवर्णा पाटील, पल्लवी निघडे, शुभांगी पाटील, नीलम इगावे यांनी परिश्रम घेतले. अधिवेशनाचे सूत्रसंचालन ऋतुजा विचारे यांनी केले. शुभांगी पाटील यांनी आभार मानले.

# विशेष श्रमसंस्कार शिबीरातील स्वयंसेवकांचे कार्य युवा पिढीसाठी मार्गदर्शक

**जी. डी. खानदेशे यांचे प्रतिपादन**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने 'Youth for My Bharat Youth for Digital Literacy' या उपक्रमांतर्गत १८ ते २४ जानेवारी या कालावधीत दत्तकगाव पिंपळगाव वाघा, ता. जि. अहिल्यानगर येथे 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' झाले.

नगर - विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मन व मनगट दोन्ही बळकट करण्याचे काम केले जाते. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, व्यसन मुक्ती, डिजिटल लिटरसी, अंधश्रद्धा निर्मूलन, समतल चर खोदणे, जल व मृदा संवर्धन इत्यादी विविध उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक समाजासाठी सतत भरीव काम करत असतात, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने 'Youth for My Bharat Youth for Digital Literacy' या उपक्रमांतर्गत १८ ते २४ जानेवारी या कालावधीत दत्तकगाव पिंपळगाव वाघा, ता. जि. अहिल्यानगर येथे 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' झाले. या शिबिराच्या समारोप समारंभासाठी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशे अध्यक्षस्थानी होते.

विशेष श्रमसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो व जीवनात येणारी प्रत्येक समस्या सोडविण्याची कला त्यांच्यात आत्मसात होते. मी स्वतः राष्ट्रीय सेवा योजनेतून घडलो व याचा मला अभिमान वाटतो असे प्रतिपादन सामान्य प्रशासन विभाग, अहिल्यानगरचे तहसीलदार शरद घोरपडे यांनी केले. समारोप समारंभाचे अतिथी म्हणून ते उपस्थित होते.

स्वयंसेवकांना शिबिरातून योग्य संस्कार मिळतात व ते जीवनाच्या प्रमुख वाटेवर पथदिव्यासारखे कार्य करतात असे मत वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

माजी मुख्याध्यापक किसन वाबळे यांनी ग्राम स्थांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. युवा शक्ती एकजूट होऊन सकारात्मक कार्याकडे वळवली तर त्यातून किती मोठे कार्य उभे शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे पिंपळगाव वाघा येथे न्यू आर्टस् महाविद्यालयातील एन.एस.एस.च्या स्वयंसेवकांनी शिबीर कालावधीत बांधलेला गॅबियन बंधारा होय. शिबिराच्या सात दिवसाच्या कालावधीत स्वयंसेवकांनी १८ मी. लांब, १.२ मी. उंच व २.८ मी. रुंद अशा गॅबियन बंधाऱ्याची निर्मिती केली.

गौरी हजारे व गौरव चांगुणे या दोन स्वयंसेवकांनी शिबिराच्या सात दिवसाच्या कालावधीतील आपले अनुभव व्यक्त केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश निमसे यांनी प्रास्ताविक व संपूर्ण शिबिराचा आढावा मांडला. डॉ. नयना कडाळे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला, प्रा. भगवान कुंभार यांनी आभार मानले तर प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी कला शाखा समन्वयक डॉ. किसन अंबाडे, सरपंच सौ. सुलोचना नाट, उपसरपंच सौ. गयाबाई नाट, प्रा. अंबिका कुसळकर, मुख्याध्यापक सुमेधावती शेजूळ, माजी मुख्याध्यापक किसन वाबळे, स्कूल कमिटीचे अध्यक्ष आदिनाथ वाबळे, संतोष वाबळे, अमोल येणारे, रावसाहेब वाबळे, बाबासाहेब शिंदे, बाबासाहेब नाट, ग्रामस्थ व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे व तिन्ही शाखांचे उपप्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले.



डॉ.ना.ज.पाऊलबुधे महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्राम प्रसंगी फार्मासिस्ट विद्यार्थी, शिक्षकांनी शपथ घेतली. (छाया - विजय मते)

# डॉ. पाऊलबुधे फार्मसीत इंडक्शन प्रोग्राम

नगर - वसंत टेकडी जवळील डॉ. ना. ज. पाऊलबुधे महाविद्यालयात ४ दिवस इंडक्शन प्रोग्राम झाला. या व्याख्यानमालेचे उद्घाटन सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासक डॉ.श्रद्धा पाऊलबुधे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, बी व डी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य, शैक्षणिक संकुलाचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद उपस्थित होते. या व्याख्यानमालेमध्ये शैक्षणिक संकुलाच्या प्रमुख डॉ. रेखाराणी खुराणा यांनी कॉलेजचे नियम, पॉलिसी याबाबत माहिती देऊन आदर्श विद्यार्थी होण्यासाठी मार्गदर्शन केले.

डॉ.वेणू कोला यांनी बी फार्मसी अॅकॅडमीची ओळख करून देत नायपर परीक्षा कशाप्रकारे उत्तीर्ण होऊन विद्यार्थ्यांना फार्मसीचे महत्व विशद केले. दुर्गेश पवळे यांनी व्याख्यानामध्ये सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे नियम, प्रॅक्टिकल बाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य संदीप कांबळे यांनी जीवनात विद्यार्थ्यांनी वेळेचे व्यवस्थापन कसे करावे, वेळ ही किती महत्त्वाची असते. यावर प्रकाश टाकला.

बी फार्मसी चे प्राचार्य डॉ. श्याम पंगा यांनी विद्यार्थ्यांना कसे शिकायचे आणि कसे शिकावे यामधील फरक स्पष्ट करून जर तुम्ही नम्र असाल तर तुमचं कोणीही काही बिघडू शकत नाही. त्यासाठी नम्रता गुण अंगी बाळगा असे आवाहन केले.

डॉ. सुचित्रा डावरे यांनी विद्यार्थ्यांनी मोठ्या माणसांची कशाप्रकारे वागावे व कसे कम्युनिकेशन ठेवावे याबाबत माहिती देऊन वाचन व लिखाण याबाबत मार्गदर्शन केले.

या इंडक्शन प्रोग्रामवर परीक्षा घेण्यात आली. यामध्ये प्रथम कल्याणी साठे, द्वितीय आदित्य साठे, प्रतीक्षा क्षीरसागर तर तृतीय आशुतोष कोल्हे यांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले. फार्मासिट च्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सामूहिक शपथ घेऊन या व्याख्यानमाले ची सांगता करण्यात आली. शेवटी श्रद्धा मुंदडा यांनी आभार मानले.

# आई-वडीलांची सेवा केल्यावर देव भेटणारच

## ह.भ.प.इंदोरीकर महाराज यांचे प्रतिपादन; श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व पर्जन्येश्वर महादेव मंदिर यांच्या वतीने किर्तन सोहळा



दातरंगे मळा येथील श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व पर्जन्येश्वर महादेव मंदिर यांच्या वतीने किर्तन सोहळ्यात मार्गदर्शन ह.प.भ इंदोरीकर महाराज. समवेत भाविक.

नगर - जन्म,मृत्य, निसर्ग हे देवाच्या हातात आहे. पण जन्म आणि मृत्य यांच्या मधला जो काळ आहे. तो मानवाच्या हातात आहे. त्याला तीन टप्पे आहेत, पहिला बालपण, दुसरा तरुणपण व तिसरा म्हतारपण. बालपण हे आई-वडीलांनी दिलेल्या संस्कारावर अवलंबून आहे. तरुणपण हे तुमच्या कर्तृत्व शक्तीवर अवलंबून आहे. आणि म्हतारपण हे केलेल्या पुण्याईवर अवलंबून आहे. देवाची पुजा केल्यावर देव मिळेलच अस नाही, पण आई-वडीलांची सेवा केल्यावर देव भेटणारच यात मात्र शंका नाही. संपत्ती मिळाल्यावर सुख मिळेल, पण समाधान मिळेलच अस नाही, पण समाधान मिळाल्यावर देव मिळेलच यात शंका नाही, असे आपल्या किर्तनातून ह.भ.प. इंदोरीकर महाराज यांनी सांगितले.

दातरंगे मळा येथील श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व पर्जन्येश्वर महादेव मंदिर आयोजित किर्तन सोहळ्यात ह.प.भ इंदोरीकर महाराज बोलत होते. यावेळी माजी नगरसेवक अर्जुन दातरंगे, भिमराज दातरंगे, अनिल दातरंगे, ठकाराम दातरंगे, गुलाब दातरंगे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदिप दातरंगे, अशोक दातरंगे, सुरेश दातरंगे, दत्ता दातरंगे, गणेश दातरंगे, अशोक आगरकर, रमेश आगरकर, स्वप्निल दातरंगे, बाबा दातरंगे, चंद्रकांत दातरंगे, बंडू दातरंगे, बाळासाहेब दातरंगे, भरत आगरकर, रोहिदास दातरंगे, दिलीप दातरंगे, सोनू दातरंगे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमप्रसंगी आमदार संग्राम जगताप, माजी महापौर रोहिणीताई शेंडगे, संपर्कप्रमुख दिलीप सातपुते, संभाजी कदम, जिल्हापमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख सचिन जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सभापती गणेश कवडे, गटनेते संजय शेंडगे, सहसचिव विक्रम राठोड, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्ता जाधव, शाम नळकांडे, सचिन शिंदे, संतोष ग्यानप्पा, परेश लोखंडे, अजय चितळे, अनिल बोरुडे, संजय चोपडा, सुरेश तिवारी, महेश लोंढे, अरविंद शिंदे, दत्ता कावरे, विष्णु फुलसौंदर, सूरज जाधव, सुनिल त्रिपाठी, संजय शेळके, विठ्ठल जाधव, संजय सांयगावकर, रमेश खेड़कर, अरुण झेंडे, अशोक दहीफळे, शंकर ठाणगे, राजमल मुनोत, बबन खरमाळे, देवराम मेहेत्रे आदी उपस्थित होते.

यावेळी संदिप दातरंगे म्हणाले की, आमच्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबबित असतो. त्यामध्ये धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, क्रिडा विषयक, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, नागरीकांना मदतीचा हात आदींच्या माध्यमातून जनसेवा करत आहोत. सुखी जीवन जगण्यासाठी संतांचे विचार आपल्या सोबत असायला हवे. तसेच नागरीकांना संतांचे विचार समजावे, त्यासाठी प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक वर्षापासून या किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# नगर शहरात ९ फेब्रुवारी रोजी ऋणानुबंध राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

नगर - ऋणानुबंध बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचा २०२३-२४ या वर्षीचा राज्यस्तरीय पुरस्कार' वितरण सोहळा ९ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगरमध्ये माउली सभागृह येथे समाजसेवक अण्णा हजारे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, बुलढाण्याचे मुख्य कार्य. अधिकारी गुलाब खरात, राज्याचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांच्या हस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमाला जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, बँक ऑफ महाराष्ट्राचे झोनल मॅनेजर शशांक साहू आणि डॉ. राजेंद्र धामणे व सुचेता धामणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळे काम करण्याऱ्या व्यक्तींचे काम लोकांसमोर आणून त्यांचा सन्मान करणे व नागरिकांपर्यंत त्याचे कार्य पोहचवणे हा या पुरस्कार सोहळ्यामागील उद्देश असल्याचे अजित रोकडे आणि सचिव प्रशांत बंडगर यांनी म्हटले आहे.

यावर्षी संस्थेने जाहीर केलेले पुरस्कार हे विविध क्षेत्रातील असून सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल पुणे येथील उद्योजक व विजय मोरे, तृतीयपंथी डॉ. आम्रपाली उर्फ अमित मोहिते, नाशिकचे महंत डॉ. रत्नाकर पवार, संदीप सोनवणे, कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेले लातूरचे बाळासाहेब दाताळ, आरोग्य क्षेत्रासाठी डॉ. दीप्ती साळी, शिक्षण क्षेत्रासाठी शिशु संगोपन संस्थेचे दशरथ खोसे, इतिहास संशोधन आणि संवर्धन कार्यासाठी पत्रकार भूषण देशमुख यांसह कृषी व ग्रामीण पत्रकारितेसाठी कै.अशोक तुपे यांना मरणोपरांत पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. या बरोबरच सामाजिक क्षेत्रात अनेक वर्षांपासून योगदान देत असलेले हेल्पिंग हॅन्ड्स फॉर हँगर्स, बालघर प्रकल्पाचे युवराज गुंड, 'सावली' चे नितेश बनसोडे आणि श्रीगोंद्याच्या फासेपारधी व आदिवासी मुलांसाठी संस्था चालवण्याऱ्या शुभांगी झेंडे यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे असे उपाध्यक्षा सारिका रघुवंशी यांनी म्हटले आहे.

या कार्यक्रमाबरोबरच कलाकार सुमधुर हिंदी मराठी गीतांचा कार्यक्रम ही सादर करणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. विवेकानंद कंगे, भानुदास महानुर, सचिन परदेशी, शुभांगी ओहोळ, महेश घावटे, प्रतिभा साबळे, डॉ. खंडागळे यांनी केले.



महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिरच्या इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात बोलताना प्राचार्या विभावरी रोकडे.

# शिस्त, संस्कार, व सकारात्मकता यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली

## प्राचार्या विभावरी रोकडे यांचे प्रतिपादन

नगर - विद्यार्थ्यांनी शिस्त, चिकाटी व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जर प्रयत्न केले तर ते कुठलेही ध्येय साध्य करू शकतात. जीवनाला आकार देण्यासाठी विद्यार्थ्यांनी शालेय संस्कार, वेळेचे नियोजन व प्रयत्नांमध्ये सातत्य राखणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन येथील नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर विद्या मंदिरच्या प्राचार्या विभावरी रोकडे यांनी केले.

शाळेतील इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या अध्यक्षा म्हणून त्या बोलत होत्या. विविध उदाहरणांद्वारे तसेच बोधप्रद गोष्टींद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षिका मंदा शिंदे, ज्येष्ठ शिक्षक रेवण घंगाळे, सोपानदेव शिंदे, शिक्षक प्रतिनिधी विनोद गाडगे आदी उपस्थित होते.

बाबासाहेब दरवडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले. चोथे वैष्णवी, गाढवे सानिका, वेदपाठक श्रावणी, बोरूडे अमृता, पोटे राधिका, विधावे अमृता, मैड जागृती, दातरंगे प्रियंका, जाधव सिद्धी या विद्यार्थिनींनी भाषणे करून शाळेविषयी व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. विजय कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर वैशाली मेहेत्रे यांनी आभार प्रदर्शन केले.

# संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याची निमंत्रण पत्रिका ग्रामदैवत विशाल गणेशाला देवून वाटपाचा शुभारंभ



माळीवाड्यातील श्रीविशाल गणपती मंदिरात विधीवत पूजा करून कथा सोहळ्याची निमंत्रण पत्रिका श्रीगणपतीला देण्यात आली. कथा सोहळ्याचे मुख्य यजमान रामनिवास इंदाणी, सतीशचंद्र इंदाणी यांच्या हस्ते यथासांग पूजा विधी झाला. याचे पौरोहित्य करताना वेदमूर्ती गणेश भालेराव.

नगर - श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टव्दारा अहिल्यानगरमध्ये प्रथमच जोधपूर (राजस्थान) येथील श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या अमृतवाणीने संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान दुपारी ३ ते ६ या वेळेत नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉनमध्ये करण्यात आले आहे. या सोहळ्याची निमंत्रण पत्रिका ग्रामदैवत श्रीविशाल गणपतीला देवून पत्रिका वाटपाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार यांनी दिली.

ते म्हणाले, शहराचे ग्रामदैवत असलेल्या माळीवाड्यातील श्रीविशाल गणपती मंदिरात विधीवत पूजा करून कथा सोहळ्याची निमंत्रण पत्रिका श्रीगणपतीला देण्यात आली. कथा सोहळ्याचे मुख्य यजमान रामनिवास इंदाणी, सतीशचंद्र इंदाणी यांच्या हस्ते यथासांग पूजा विधी झाला. वेदमूर्ती गणेश भालेराव यांनी पौरोहित्य केले.

याप्रसंगी श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, खजिनदार मगनलाल पटेल यांच्यासह बाळासाहेब आगरकर, विपुल शहा तसेच कार्यालय समिती प्रमुख हिरालाल पटेल, प्रचार व प्रसार समिती प्रमुख रामेश्वर बिहाणी, मिलिंद चवंडके, बजरंग दरक, अर्थ समिती प्रमुख रविंद्र गुजराथी व नितीन मंत्री, पूर्जाअर्चा व धार्मिक अनुष्ठान समिती प्रमुख हर्षल शहा, अतिथी निवास समिती प्रमुख विनोद पटेल व सोमनाथ नजान, भोजन प्रसाद समिती प्रमुख सुरेश चांडक व देवकिसन मणियार, प्रसाद वितरण समिती प्रमुख पुरूषोत्तम नावंदर, मंडप समिती प्रमुख शरद झंवर, जनसंपर्क समिती प्रमुख मधुसूदन सारडा व विजय पंजाबी, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख डॉ.विजय भंडारी, स्टोअर समिती प्रमुख पुरूषोत्तम पटेल, पार्किंग व्यवस्था समिती प्रमुख विशाल पटेल. कार्यक्रम सूत्रसंचालिका कु.हर्षा गुजराथी आदी उपस्थित होते.

भक्त शिरोमणी संत मीराबाईंच्या जीवन चरित्राचे गुणगान श्री राधाकृष्णजी महाराजांच्या अमृतवाणीमधून ऐकण्याची पर्वणी नगरकरांना प्रथमच लाभणार आहे. या कथा सोहळ्याच्या श्रवणाचा आनंद घेण्यासाठी अहिल्यानगर शहरासह उपनगरातील भाविकांनी विशेषतः युवक-युवतींनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.

# एक हजार सभासद नोंदणीचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल सविता कोटा यांचा सन्मान




एक हजार सभासद नोंदणीचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल भाजपच्या शहर जिल्हा सरचिटणीस सविता कोटा यांचा सन्मान करताना शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर आदी पदाधिकारी.

नगर - शहरात घरो घरी जावून तसेच महिलांशी संवाद साधून एक हजार सभासद नोंदणीचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल भाजपच्या शहर जिल्हा सरचिटणीस सविता कोटा यांचा सन्मान करण्यात आला. सर्वाधिक सभासद नोंदणी केल्याबद्दल शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी सविता कोटा यांचा सत्कार केला. यावेळी शहर जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, शहर जिल्हा उपाध्यक्ष संध्या पावसे, शहर जिल्हा चिटणीस बंटी ढापसे, राखी आहेर, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, युवा मोर्चाचे अध्यक्ष मयूर बोचुघोळ, अल्पसंख्यांक अध्यक्ष साहिल शेख, महिला मोर्चाचे उपाध्यक्ष निता फाटक, महिला मोर्चाचे सरचिटणीस ज्योती दांडगे, अनिल निकम, सचिन कुसळकर, अमोल निस्ताने, विनोद बोगा, करण भाऊ, धीरडे काका आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ॲड. अभय आगरकर म्हणाले की, संपूर्ण शहर भाजपमय करण्यासाठी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सभासद नोंदणी अभियानात सहभाग नोंदवला. घरोघरी, महाविद्यालय, विविध व्यावसायिक, व्यापारी व विविध संस्थेत जाऊन ऑनलाईन सभासद नोंदणी करण्यात आली. इच्छुक नागरिकांना देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भाजपचे सदस्य बनवून घेण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सविता कोटा यांनी सभासद नोंदणी केलेले कार्य दिशादर्शक असून, घरोघरी जावून त्यांनी भाजपचे विचार व कार्य पोहचवून त्यांना सभासद करुन घेतल्याचे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना सविता कोटा यांनी हर घर सदस्य नोंदणीच्या माध्यमातून नागरिकांना भाजपशी जोडण्यात आलेले आहे. कल्याणकारी राज्यामुळे भाजपकडे सर्वसामान्य जनता आकर्षित होत आहे. भाजपने आपल्या सत्तेत सर्वसामान्य नागरिकांना आधार दिला. तर लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिलांना सन्मान मिळवून दिला आहे. यासाठी नागरिकांमधून सदस्य होण्यासाठी मागणी वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



सहलीसाठी जमलेले ज्येष्ठ नागरिक

# ज्येष्ठ नागरिकांचे सहलीचे आयोजन

नगर - आयुष्याची संध्याकाळ मजेत जावी, येणारा प्रत्येक क्षण आनंदाने भरभरून जगावा, आणि इंद्रधनुष्याच्या सप्तरंगी रंग प्रमाणे आयुष्याची वाटचाल करावी याच उद्देशाने ज्येष्ठ नागरिक मंच सावेडी यांनी सहलीचे आयोजन केले होते.

सहलीची सुरुवात संकेत फार्म वांबोरी येथून झाली. तेथील निसर्गरम्य वातावरणात सर्वांनी एकत्र येऊन सहलीचा आनंद घेतला. कार्यक्रमाची सुरुवात कैलास बेरड यांच्या भावगीत भक्ती गीताने झाली. तर ज्योती केसकर यांनी प्रश्नम मंजुषाचा कार्यक्रम सादर केला. यावेळी पुष्प चितांबर यांनी निवडक कविता सादर करून कार्यक्रमाची व सहलीची शोभा वाढवली. यामध्ये तलावातील बोटिंग, हुरडा पार्टी, प्रश्नमंजुषा कार्यक्रम, भावगीत भक्ती गीते या गाण्याचा कार्यक्रम तसेच विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम यावेळी सर्वांनी सादर केला.

त्यानंतर महानुभव पंथाचा कृष्ण मंदिराचे सर्वांनी दर्शन घेऊन नेवासा येथील ज्ञानेश्वर माऊलींच्या प्रसिद्ध खांबाचे दर्शन घेतले. पसायदानाने या छोट्याशा स्नेहसंमेलन आणि सहलीची सांगता झाली. सहलीसाठी अशोक काळे, शरद कुलकर्णी, ज्योती केसकर, बलभीम पांडव, बाजीराव जाधव, पुष्पा चितांबर, आदिनाथ जोशी यांनी नियोजन केले. संचालन शरद कुलकर्णी यांनी केले.



वाडिया पार्क येथे अहिल्यानगर महानगरपालिकेच्यावतीने अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. (छाया - लहू दळवी)

# ताणतणाव कमी करण्यासाठी खेळाची गरज

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; महापालिकेच्यावतीने अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन


नगर - महानगरपालिकेचे माध्यमातून अधिकारी कर्मचारी शहराची सेवा करीत असताना वर्षातून काही दिवस एकत्र येऊन क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून खेळाचा आनंद घेतात धकाधकीच्या जीवनामध्ये तान तणाव कमी करण्यासाठी व्यायामाची खरी गरज आहे मात्र मोबाईलच्या अति वापरामुळे आपला अमूल्य वेळ वाया घालवतो. हाच वेळ आपण व्यायामासाठी किंवा आपल्या आवडीच्या खेळासाठी दिला तर आपले आरोग्य सदृढ व निरोगी राहील. या माध्यमातून आनंदीमय जीवन जगता येईल. ऑफिसचे काम करताना उत्साह राहील याचबरोबर क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून एकोप्याचे वातावरण निर्माण होत असते मनपा अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजक केले असल्याचे प्रतिपादन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले

वाडिया पार्क येथे महापालिकेच्यावतीने अधिकारी कर्मचारी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपायुक्त वैशाली शिंदे, उपायुक्त सपना वसावा, जलअभियंता परिमल निकम, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, इंजि.श्रीकांत निंबाळकर, क्रीडा अधिकारी फिलिप्स, अनिल लोंढे, विकास गीते, राहुल साबळे, अजय कांबळे, कैलास चावरे आदीसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांसाठी वर्षातून एकदा क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामध्ये क्रिकेट, बुद्धिबळ, धावणे, लांब उडी, गोळा फेक, बॅडमिंटन, कबड्डी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. तसेच माऊली संकुल येथे कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याची माहिती क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी दिली. यशवंत डांगे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन क्रिकेटच्या सामन्याने झाले त्यावेळी आयुक्त यांनी फलंदाजी करीत क्रिकेटच्या खेळाबद्दलचे आवड दिसून आली.

# राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या वार्षिक सभेत सेवानिवृत्तांच्या प्रश्नांवर चर्चा

## बलभीम कुबडे याची राज्य केंद्रीय सदस्यपदी तर गंगाधर कोतकर यांची जिल्हाध्यक्षपदी निवड



राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना अहिल्यानगर विभागाच्या वार्षिक सभेत सेवानिवृत्तांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करताना विभागीय सचिव गोरख बेळगे. समवेत संघटनेचे पदाधिकारी.

नगर - राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना अहिल्यानगर विभागाची वार्षिक सभेत सेवानिवृत्तांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. टिळक रोड येथील श्रमिक कार्यालयाच्या सभागृहात विभागीय सचिव गोरख बेळगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुनिलराव कोल्हे, माजी बॅक संचालक डी.जी. अकोलकर, माजी वाहतूक निरीक्षक राजेंद्र माने, नवनिर्वाचित राज्य केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे आदींसह सभासद उपस्थित होते.

संघटनेचे मयत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहून बैठकीला प्रारंभ करण्यात आले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे याची राज्य केंद्रीय सदस्यपदी निवड झाल्यामुळे रिक्त असलेल्या जिल्हाध्यक्ष पदावर तारकपूर आगाराचे माजी वाहक गंगाधर कोतकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. वार्षिक हिशोब, सेवानिवृत पास पेन्शनबदल संघटनेचे सुरु असलेल्या कामाबाबत आढावा घेण्यात आला.

बलभीम कुबडे म्हणाले की, शंभर सभासदांची नोंदणी झाल्यामुळे राज्यात नगर विभागाचा तिसरा क्रमांक आल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. पुढील काळात सेवानिवृत्ती पास एक वर्षाचा व सर्व बसेसमध्ये त्याचा लाभ मिळण्यासाठी केंद्रीय सदस्यांच्या बैठकीत विषय मांडणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. सर्वांच्या सहकार्यामुळे केंद्रीय सदस्यपदी काम करण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

उपस्थितांनी संघटनेच्या माध्यमातून सेवानिवृत्तांच्या प्रश्नावर सुरु असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केला. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष गंगाधर कोतकर यांनी पुढील काळात सर्व पदाधिकारी यांना बरोबर घेऊन संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. अण्णासाहेब आंधळे यांनी प्रलंबीत प्रश्न सुटण्यासाठी व संघटना वाढीसाठी भावनिक आवाहन केले. शेवगांव आगाराचे के.के. जाधव यांनी स्वतः कोणत्या पदाची अपेक्षा न ठेवता एसटीच्या सेवानिवृत्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले.

गोरख बेळगे म्हणाले की, अत्यंत कमी असणाऱ्या पेन्शनमध्ये एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा औषधांचा देखील खर्च भागत नाही. त्यांना सन्मानाने जगण्यासाठी महागाईचा विचार करता योग्य पेन्शन मिळण्याची गरज आहे. यासाठी संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

सेवानिवृत्त कामगारांच्या प्रश्नावर २०१६ ते २०२४ मधील कामगार करारातील फरकाच्या रक्कमा लवकर मिळणे बाबत मुठाळ यांनी आपली मागणी मांडली. माजी वाहक एकनाथ औटी यांनी कर्तव्य कवितेतून सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. बाळासाहेब चव्हाण यांनी संघटनेचे पदाधिकारी सभासदाच्या पाठपुराव्याने अनेक प्रश्न मार्गी लागल्याचे विशद केले. सूत्रसंचालन अर्जुन बकरे यांनी केले. यावेळी राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना जिल्ह्यातील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. संघटनेसाठी नेहमीच सहकार्य करणारे कॉ. आनंदराव वायकर यांचे आभार मानण्यात आले. सदर बैठक यशस्वी होण्यासाठी विठ्ठल देवकर, खजिनदार श्रीदेवीदास डहाळे, ताकपेरे आदी सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




## वजन वाढवायचं तर...

आहारतंत्र

स्थूलपणा आरोग्याला मारक असतो. त्याचप्रमाणे गरजेपेक्षा अधिक बारीक असणंही चांगलं नसतं. खूप बारीक लोकांच्या व्यक्तिमत्त्वाला उठावही नसतो. मग झटपट वजन वाढवण्यासाठी कृत्रिम पावडरचा पर्याय निवडला जातो. वजन वाढवणाऱ्या पावडर्सच्या जाहिरातीही टीव्हीवर झळकतात. मात्र या पावडर्सचे काही दुष्परिणामही असतात. वजन वाढवण्याचा दावा करणाऱ्या अशा पावडर्सच्या धोक्यांविषयी...



* अशा पावडर्सच्या सेवनानंतर नैसर्गिक पद्धतीने वजन वाढत नाही. उलट चुकीच्या ठिकाणी चरबी साठून त्रास वाढू शकतो.

* आपल्या आहाराचा मूत्रपिंडांवरही परिणाम होत असतो. वजनवाढीच्या पावडर्समुळे मूतखडा होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे जाहिरातींना भुलून स्वत: कोणतेही प्रयोग करू नयेत. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच अशा पावडर्सचं सेवन करावं.

* अशा पावडर्सचं चुकीच्या पद्धतीने सेवन केल्याने यकृताचं आरोग्यही धोक्यात येऊ शकतं.

## घट्ट कपडे घालताय?

आरोग्यवेध

आजकालची बदलती जीवनशैली, कामाचा प्रचंड ताण, अनेक जबाबदाऱ्यांचे ओझे, कुटुंबाला वेळ देणे या सर्वांमध्ये पुरूषमंडळी आपल्या आरोग्याकडे फारसे लक्ष देत नाहीत. अनेक समस्यांबद्दल मोकळेपणाने बोलत नाहीत. पुरुषांच्या प्रजननक्षमतेबद्दल आपल्या समाजात क्वचितच बोलले जाते, कारण अनेकांना ही समस्या लज्जास्पद वाटते; परंतु त्याबद्दल न बोलणे ही चिंतेची बाब असू शकते. आजच्या काळात प्रत्येकामध्ये काही ना काही शारीरिक कमतरता असते. पुरुषांच्या प्रजननक्षमतेवर परिणाम होण्यामागे अनेक कारणे असू शकतात, त्यापैकी एक म्हणजे घट्ट कपडे घालणे. घट्ट कपड्यांचा शुक्राणूंवर नकारात्मक परिणाम होतो. अनेक शास्त्रज्ञांना अभ्यासातून आढळून आले आहे की, घट्ट कपडे परिधान केल्याने कंबरेमध्ये जास्त उष्णता निर्माण होते. त्याचा शुक्राणूंवर नकारात्मक परिणाम होतो.



पुरुषांच्या प्रजननक्षमतेशी संबंधित समस्या अनुवंशिकतेमुळेदेखील उद्‌भवू शकतात; परंतु जीवनशैलीशी संबंधित बाबी, जसे की घट्ट कपडे घालणे, धूम्रपान करणे, दारू पिणे आणि वाढलेला ताणदेखील शुक्राणूंच्या आरोग्यावर परिणाम करू शकतो शुक्राणू निरोगी ठेवण्यासाठी, कंबरेभोवती योग्य तापमान राखणे महत्वाचे असते. घट्ट कपड्यांमुळे रक्तप्रवाह कमी होतो आणि म्हणूनच पुरुषांनी घट्ट कपड्यांऐवजी आरामदायक आणि सैल-फिटिंग कपडे घालावेत.

**घट्ट कपडे किती वेळ घालणे योग्य?**

काही मिनिटे किंवा तासासारख्या कमी कालावधीसाठी घट्ट कपडे परिधान केल्याने कोणतेही नुकसान होऊ शकत नाही. तथापि, दिवसभरात सात ते आठ तासांपेक्षा जास्त काळ ते परिधान केल्याने उष्णता आणि दबाव वाढू शकतो. त्यामुळे पुरुषांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे असे कपडे वापरणे शक्यतो टाळावे.

## दातांमुळेही होतो कर्करोग

आरोग्य चर्चा

कर्करोग हा एक असा गंभीर आजार आहे, ज्याचे नाव ऐकताच भल्याभल्यांना घाम फुटतो. आजकाल दातांचे आजारही खूप वाढले आहेत. दातांच्या आरोग्याविषयी सर्वात जास्त सांगितली जाणारी बाब म्हणजे दातांची योग्य काळजी घेतली तर आपण अनेक रोगांना दूर ठेवू शकतो. दात स्वच्छ करणे, वेळोवेळी तपासणे, योग्य ब्रश आणि पेस्ट वापरणे यामुळे तोंडाचे आरोग्य चांगले राहते. दात अस्वच्छ राहिल्यामुळे कर्करोग होऊ शकतो, हे अनेकांना माहीत नाही.



आपले दात हे आपल्या शरीराचा भाग आहेत. त्याचे सर्वात जास्त संरक्षण करणे आवश्यक आहे. तोंडाचे आरोग्य हे केवळ दात आणि हिरड्यांच्या समस्यांपुरते मर्यादित नाही, तर त्यामुळे गंभीर आजार होऊ शकतात. तोंडाची स्वच्छता आणि दातांची काळजी नियमितपणे घेतली नाही, तर हिरड्यांमध्ये जळजळ आणि इतर संसर्ग होऊ शकतात. कालांतराने या संसर्गामुळे दीर्घकाळ जळजळ होऊ शकते. परिणामी, आपल्या त्वचेच्या पेशींच्या डीएनएला नुकसान होऊन कर्करोग होऊ शकतो. त्यामुळे तोंडाच्या कर्करोगाचा धोका सर्वाधिक असतो.

तंबाखू, मद्यपानामुळे जादा धोका

तंबाखू, सुपारी यांचे सेवन करणारे आणि अतिप्रमाणात मद्यपान करणाऱ्यांचे दात आणि हिरड्यांच्या आरोग्याला हानी पोहोचते. या सवयी केवळ हिरड्या कमकुवत करत नाहीत, तर कर्करोगास कारणीभूत असलेल्या जीवाणूंना जन्म देतात. या गोष्टी चघळल्याने काही वेळा गालाच्या आतील भागात ओरखडे उमटतात. त्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

**तोंडाच्या कर्करोगाची लक्षणं**


* तोंडाच्या आत पांढरे किंवा लाल ठिपके असणे. * चघळण्यात किंवा बोलण्यात अडचण जाणवणे. * दात मोकळे होणे. * जबडा किंवा घशात गाठी.

**'या' गोष्टींची घ्या काळजी**

* दिवसातून २ वेळा ब्रश करा. * आठवड्यातून दोन- तीन वेळा फ्लॉस करा. * दर सहा महिन्यांनी दातांची तपासणी करा. * तंबाखू आणि दारूचे सेवन थांबवा. * सकस आणि संतुलित आहार घ्या.

## एकटेपणामुळे आजारांना निमंत्रण

एकटेपणामुळे अनेक आजारांचा धोका असतो. एकटेपणामुळे हृदयविकार, पक्षाघात, स्मृतिभ्रंश यासह शारीरिक आणि मानसिक आरोग्याशी संबंधित अनेक आजारांचा धोका वाढतो. एकटेपणामुळे अकाली मृत्यूदेखील होऊ शकतो. माणूस एकटा राहतो तेव्हा अनेक गोष्टींचा विचार करू लागतो. त्याच्या मनात नेहमी नकारात्मक विचार येतात. त्यामुळे हृदयविकार आणि पक्षाघाताचा धोका वाढतो.



एकाकीपणामुळे उच्च रक्तदाबाचा, टाइप २ मधुमेहाचा धोका वाढू शकतो.

मानसिक आरोग्यावरच एकटेपणाचा परिणाम होत नाही, तर अनेक घातक आजारही होऊ शकतात. एका अहवालानुसार, एकटेपणा कधी कधी जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे यापासून दूर राहिले पाहिजे.

* एकाकीपणामुळे सामाजिक चिंता निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत लोकांना बाहेर जाण्याची किंवा इतरांना भेटण्याची चिंता वाटू लागते. इतरांशी बोलण्यास कचरतात. लोक आपल्याबद्दल काय विचार करतील याची भीती वाटते.

* एकाकीपणामुळे अनेक जुनाट आजारांचा धोकाही वाढू शकतो. समाजापासून अलिप्त राहणाऱ्या लोकांना उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका जास्त असतो, हेही संशोधनात सिद्ध झाले आहे.

* चुकीची जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे मधुमेहाची समस्या झपाट्याने वाढत आहे; पण एकटे राहणाऱ्यांसाठी त्याचा धोका खूप जास्त असू शकतो. त्यांना अनेकदा झोपेच्या समस्यादेखील असू शकतात.

* एका संशोधनानुसार, एकटेपणा हे डिस्टिमिया म्हणजेच सततच्या नैराश्याचे कारण असू शकते. यात मनात वाईट विचार येतात, नकारात्मकता असू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत आत्मविश्वास हळूहळू कमी होऊ लागतो.


## धोकादायक हेपेटायटिस

मनोविकार

हेपेटायटिसमुळे दर वर्षी जगभरात हजारो लोकांचा मृत्यू होतो. जगातला दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख संसर्गजन्य विकार म्हणून तो गणला जातो. असं असलं, तरी हेपेटायटिसबाबत म्हणावी तितकी जागरूकता निर्माण झालेली नाही. या विकाराच्या लक्षणांबाबत लोक अनभिज्ञ असतात. म्हणूनच आपल्याला या रोगाची लागण झाल्याचं अनेकांच्या गावीही नसतं. वेळीच निदान झालं तर योग्य उपचारांनी हेपेटायटिस बरा होऊ शकतो. मात्र जागरूकतेच्या अभावामुळे हा विकार गंभीर स्वरुप धारण करतो. हेपेटायटिसचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने २०३० पर्यंत हेपेटायटिसचं समूळ उच्चाटन करण्याची मोहीम हाती घेतली आहे. म्हणूनच हेपेटायटिससारख्या घातक विकाराबाबत जाणून घेणं गरजेचं ठरणार आहे.

हेपेटायटिस म्हणजे विशिष्ट प्रकारच्या विषाणूंमुळे निर्माण झालेला यकृताचा दाह. या विषाणूंवर वेळीच उपचार झाले नाहीत तर पुढे फायब्रोसिस, सायऱ्होसिस किंवा अगदी यकृताचा कर्करोग होण्याचा धोका असतो. हेपेटायटिसच्या विषाणूंचे पाच प्रकार आहेत. ए, बी, सी, डी आणि ई असे हे प्रकार होत.

हेपेटायटिस ए आणि ई या विषाणूने संक्रमित अन्न किंवा पाण्याच्या सेवनाने जडतात तर हेपेटायटिस बी, सी आणि डी शरीरातल्या संक्रमित द्रव पदार्थांचा पचनसंस्थेशी झालेल्या संपर्कामुळे होतात. त्यातही हेपेटायटिस बी आणि सी एका माणसाकडून दुसऱ्याला होऊ शकतात. संक्रमित रक्त, शस्त्रक्रियेदरम्यान वापरली जाणारी आयुधं यांमधूनही हा विकार पसरू शकतो. लैंगिक संबंधांद्वारेही हा आजार होऊ शकतो. हेपेटायटिस बी आणि सी सर्वात घातक मानले जातात. तसंच या विकारांशी संबंधित समज आणि गैरसमज प्रचलित आहेत.



भारतातल्या इन्स्टीट्यूट ऑफ लिव्हर अँड बिलिअरी सायन्सेसच्या अहवालानुसार देशात जवळपास चार कोटी लोक हेपेटायटिस बीने बाधीत आहेत तर १.२ कोटी लोकांना हेपेटायटिस सीची लागण झाली असून दर वर्षी जवळपास दीड लाख लोकांचा या विकारामुळे मृत्यू होतो.

संक्रमित आईकडून हेपेटायटिस बी आणि सी हे आजार बाळाला होण्याचा धोका सर्वात जास्त आहे. या माध्यमातून हा आजार खूप मोठ्या प्रमाणावर पसरतो. मात्र हा आजार योग्य उपचारांनी बराही होऊ शकतो. तसंच वेळीच लस टोचल्यास त्याला प्रतिबंधही करता येतो. त्यामुळे घाबरायचं काहीच कारण नाही, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

जागरूकतेच्या माध्यमातूनच हेपेटायटिसला आळा घालणं शक्य आहे. या विकाराची दाहकता अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणं गरजेचं आहे. शिवाय लसीकरण हा या विकाराला आळा घालण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. यासोबतच रक्तदात्याच्या रक्ताची वेळीच तपासणी व्हायला हवी. इंजेक्शन देताना नव्या सिरिंजचा वापर करायला हवा. टॅटू काढताना तसंच कान, नाक टोचून घेताना सुरक्षेची विशेष काळजी घ्यायला हवी.

## निसर्गाच्या सानिध्यामुळे...

नवसंशोधन

आठवड्यातले किमान दोन तास निसर्गाच्या सानिध्यात घालवल्याने शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम रहातं असं एका संशोधनातून समोर आलं आहे. जंगल, समुद्रकिनारे, डोंगरदऱ्या, शहरांमधल्या बागा अशा ठिकाणी काही काळ घालवणं गरजेचं असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. यासाठी एक लाख ९८ हजार ०५६ ब्रिटिश नागरिकांचा अभ्यास करण्यात आला. निसर्गरम्य वातावरणात राहिल्याने अनेक व्याधींना दूर ठेवता येत असल्याचं शास्त्रज्ञांचं मत होतं. या संशोधनामुळे या गृहितकाला दुजोरा मिळाला आहे. काही काळ निसर्गाच्या सानिध्यात घालवल्याने ताणतणाव कमी होणं, रक्तदाब नियंत्रणात रहाणं, चांगली झोप, हृदयविकार तसंच मधुमेहाचा धोका कमी होणं यासारखे लाभ होऊ शकतात. त्यामुळे आठवड्यातले दोन तास निसर्गरम्य वातावरणात रहायला काहीच हरकत नाही.



## ... म्हणून पडतात दातांवर डाग

दंतारोग्य

काही पदार्थ आणि पेयांमुळे दात पिवळे होतात. त्यामुळे अशा पदार्थांचं मर्यादित प्रमाणात सेवन करायला हवं. सोडा आणि कार्बनयुक्त पेयं दातांवर परिणाम करतात. कार्बयुक्त पेयांमधले रंग तसंच इतर घटकांमुळे दातांवर डाग पडतात. या पेयांमधली रसायनं दातांमधल्या एनामेल या घटकावरही विपरित परिणाम करतात. चहा आणि कॉफीच्या अतिसेवनामुळे दात पिवळे दिसू लागतात. रंगीबेरंगी गोळ्या खाल्ल्यानंतर जिभेचा रंग बदलतो. त्याचप्रमाणे दातांवरही परिणाम होतो. दातांवर डाग पडतात. विविध प्रकारचे सॉस आणि व्हिनेगारमुळे पदार्थांना छान चव येत असली तरी त्यामुळे दातांवर डाग पडू शकतात. टोमॅटो सॉसमध्ये आम्लयुक्त घटक असतात. त्याचा परिणाम दातांच्या आरोग्यावर होत असतो.



## कागदी स्ट्रॉ वापरताय?

आपण कुठे चुकतो?

प्लास्टिकला पर्याय म्हणून कागदी स्ट्रॉचा वापर केला जातो. पण प्रत्यक्षात कागदी स्ट्रॉला पर्याय म्हणून प्लास्टिक स्ट्रॉचा वापर सुरू झाला होता. १८८८ मध्ये अमेरिकन शास्त्रज्ञ मार्व्हिन चेस्टर स्टोन यांनी पेपर स्ट्रॉचा शोध लावला. मात्र या स्ट्रॉमुळे पेयाची चव बदलत असल्याने प्लास्टिक स्ट्रॉ अस्तित्वात आले. पण आता पर्यावरणाचा विचार करून पुन्हा कागदी स्ट्रॉचा वापर सुरू झाला आहे.



पेपर स्ट्रॉसाठी वापरला जाणारा कागद लाकडापासून तयार केला जातो. रंगीबेरंगी स्ट्रॉ बनवण्यासाठी लाकडाला ब्लीच केलं जातं तसंच रंगही दिला जातो. म्हणजेच हे कागदी स्ट्रॉ एखाद्या पेयात ठेवल्यानंतर त्यातलं रसायन पेयात उतरतं आणि पेयाची चव बदलते. इतकंच नाही, तर पेय पिताना कागदाचे छोटे तुकडेही आपल्या शरीरात जातात. कागदामधला सेल्युलोज नावाचा घटक शरीरासाठी घातक नसतो पण स्ट्रॉसाठी वापरला जाणारा कागद रसायनमिश्रित असल्याने घातक ठरू शकतो.

त्यामुळे प्लास्टिक, कागदच काय तर बांबू आणि स्टीलच्या स्ट्रॉचाही वापर करू नये. पेयं ग्लासनेच प्यावीत. त्यातच स्ट्रॉने पेयं पिताना हवाही शरीरात जाते. यामुळे पोट फुगणं, पोटात गोळे येण्यासारख्या समस्या निर्माण होतात.

## नियमित खा आलं

आयुर्वेद आणि विकार

आलं हा आपल्या आहारातला औषधी घटक आहे. म्हणूनच आयुर्वेदात आल्याला खूप महत्त्व देण्यात आलं आहे. आलं घातलेल्या चहामुळे तरतरी येते. पण आल्याचा वापर चहापुरता मर्यादित ठेऊ नये. विविध मार्गांनी आणि पद्धतींनी आल्याचं सेवन करायला हवं. विशेषत: सकाळी आल्याचं सेवन करणं गरजेचं आहे. नाश्त्याच्या पदार्थांमध्ये आलं घालून खाता येईल. सकाळच्या वेळी आल्याचं सेवन करण्याच्या कारणांविषयी जाणून घेऊ.

आल्यामुळे भुकेवर ताबा ठेवणं शक्य होतं. दररोज सकाळी आलं खाल्ल्याने अतिखाणं टाळता येतं. भुकेवर नियंत्रण रहातं. यामुळे वजन कमी व्हायला मदत होते. वजन कमी करण्यासाठी आल्याचं पाणी प्यायला हवं. यासाठी आधी गॅसवर पाणी उकळायला ठेवा. उकळी आल्यावर त्यात आल्याचे दोन ते तीन मोठे तुकडे घाला. आलं पाण्यात काही काळ उकळू द्या. गॅस बंद करा. पाणी गाळून घ्या. हे पाणी गरम किंवा थंड करून पिता येईल. या पाण्याच्या नियमित सेवनामुळे रक्तातल्या साखरेची पातळीही नियंत्रणात रहाते.



सकाळी आल्याचं पाणी प्यायल्याने त्वचा नितळ होऊ शकते. केसांचं आरोग्यही सुधारतं. त्वचा आणि केसांसाठी वापरली जाणारी रसायनयुक्त उत्पादनं बाजूला सारून आल्याचं नियमित सेवन करा. आल्याच्या सेवनाने पोटाच्या तक्रारी दूर व्हायला मदत होईल. आल्यात शरीराचा दाह कमी करणारे गुण असतात. आल्यामुळे कोलेस्टेरॉलचं प्रमाणही नियंत्रणात रहातं.

## काचबिंदू असेल तर...

डोळ्यांचं आरोग्य

काचबिंदू झाल्यानंतर डोळ्यांची विशेष काळजी घ्यायला हवी. काचबिंदूवर उपचार सुरू असतील तर सगळी औषधं नियमित घ्या. डोळ्यांची वरचेवर तपासणी करून घ्या. नेत्रतज्ज्ञांनी आय ड्रॉप्स सुचवले असतील तर ते त्यांच्या सल्ल्यानुसारच घाला. काचबिंदूच्या औषधांचा वापर योग्य पद्धतीने केला तर अधिक चांगला प्रभाव पडतो. तसंच औषधांच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी होते. डोळ्यात ड्रॉप्स घालण्याआधी हात स्वच्छ धुवून घ्या. ड्रॉप्सची बाटली डोळ्यांजवळ न्या. दुसऱ्या हाताने डोळ्यांचा खालचा भाग ओढा. आता या भागात ड्रॉप्स टाका. यामुळे ड्रॉप्स अधिक परिणामकारक ठरतील.



## का होतो हृदयविकार?


व्याधी विचार

हृदयविकार आणि पक्षाघात या विकारांमुळे भारतात अनेकांचा मृत्यू होतो. अनेक कारणांमुळे आपलं हृदय धोक्यात येतं. हृदयविकाराचा झटका हा अत्यंत धोकादायक असा आजार आहे. हृदयाच्या स्नायूंना होणारा रक्तपुरवठा कमी होत पूर्णपणे थांबला की हृदयविकाराचा झटका येतो. हृदयाच्या पंपिंगच्या क्षमतेवर परिणाम झाल्याने हृदयक्रिया बंद पडू शकते. यासोबतच हृदयाच्या भित्तिकांशी संबंधित विकार असतात. तसंच हृदयाच्या ठोक्यांची अनियमितताही हृदयविकाराला निमंत्रण देते. सध्याच्या धकाधकीच्या काळात हृदयाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आपलं हृदय धोक्यात आहे हे कसं ओळखायचं याविषयी...

मधुमेहामुळे हृदयविकार होऊ शकतो. मधुमेहामुळे हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी वाढतो. निरोगी व्यक्तीच्या तुलनेत मधुमेहींना हृदयविकाराचा धोका तीन ते चार पटींनी अधिक असतो.

उच्च रक्तदाब हा देखील हृदयाचा खूप मोठा शत्रू आहे. उच्च रक्तदाबाला सायलेंट किलर असंही म्हटलं जातं. सुरूवातीला या विकाराची फारशी लक्षणं दिसून येत नाहीत. वेळोवेळी रक्तदाब तपासत रहाणं गरजेचं आहे. यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका लवकर ओळखता येतो. उच्च रक्तदाबाशी संबंधित काही गैरसमजही आहेत. घरात उच्च रक्तदाबाचा इतिहास असेल तर प्रतिबंध करता येत नाही असं अनेकांना वाटतं. मात्र योग्य जीवनशैलीचा अवलंब केल्यास हा धोका टाळता येऊ शकतो.

आहारात मिठाचं प्रमाण कमी असल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होणार नाही असा काहींचा समज असतो. प्रत्यक्षात आपण विविध मार्गांनी सोडियमचं सेवन करत असतो. सॉस, सूप, बिस्किटं, प्रक्रिया केलेले पदार्थ यात भरपूर मीठ असतं. आपल्या शरीरात ७५ टक्के सोडियम याच मार्गाने जातं. त्यामुळे अशा पदार्थांमधलं सोडियमचं प्रमाण जाणून घ्यायला हवं.



उच्च रक्तदाबाची लक्षणं दिसत नसल्याने उपचार घेण्याची गरज नसल्याचा बऱ्याचजणांचा समज असतो. मात्र अनेकदा उच्च रक्तदाबाची लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे नियमित तपासणी, औषधोपचार गरजेचे ठरतात. नियमित मद्यपान, अल्कोहोलच्या अतिरिक्त सेवनामुळेही उच्च रक्तदाबाचा धोका वाढतो. यामुळे हृदयविकार किंवा पक्षाघाताचा झटका येऊ शकतो. त्यामुळे मद्यपान प्रमाणात करावं.

## कांद्याचे असेही लाभ

आजीबाईचा बटवा

पावसाळ्यात सर्दी, खोकला, ताप असे आजार होतात. या दिवसात रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याची गरज असते. यासाठी नेहमीच्या वापरातला कांदा उपयोगी पडू शकतो. विविध विकारांपासून बचाव करण्यासाठी एक कांदा बारीक चिरून घ्या. एका भांड्यात पाणी घ्या. यात चिरलेला कांदा घालून सात ते आठ तास भिजवून ठेवा. यानंतर कांदा भिजवलेलं हे पाणी दिवसातून दोन ते तीन वेळा प्या. प्रत्येक वेळी चमचाभर पाणी प्या. हे पाणी मुलांनाही देता येईल. मात्र त्याचं प्रमाण कमी ठेवावं. कांद्याच्या पाण्यात मध घालूनही पिता येईल. मधात दाह कमी करणारे गुण असतात. कांदा हा अँटीऑक्सिडंट्सनी परिपूर्ण असतो. तसंच यात दाह कमी करणारे गुणही असतात. यामुळे सर्दीसाठी हा रामबाण उपाय ठरू शकतो. कांदा लाल असो वा पांढरा, प्रत्येकात औषधी गुणधर्म असतात.



# 'अहमदनगर जिल्हा साहित्य परिषदेतर्फे' १० फेब्रुवारीपासून उर्दू सप्ताहाचे आयोजन

नगर – अहमदनगर जिल्ह्यात उर्दू प्रेमींच्या सहकार्याने उर्दू सप्ताह साजरा केला जाणार आहे. यात सर्व शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक सक्रियपणे सहभागी होतात. १० फेब्रुवारी रोजी उद्घाटन, उर्दू भाषेच्या इतिहासाचे वर्णन. भाषेचे महत्त्व आणि इतिहास याबद्दल माहिती प्रदान करणे. ११ फेब्रुवारी रोजी मुलांना पाठ्यपुस्तकातील कविता म्हणणे. १२ फेब्रुवारी रोजी उर्दू कॅलिग्राफी स्पर्धा, वाचन स्पर्धा. १३ फेब्रुवारी रोजी बैत बाजी आणि कविता वाचन स्पर्धा होईल. १५ फेब्रुवारी रोजी पवित्र ग्रंथ स्तुती आणि पठण स्पर्धा. १७ फेब्रुवारी रोजी उर्दू लेखक आणि कवींबद्दल माहिती. त्यांच्या नावांची यादी बनवुन आणि त्यांच्याबद्दल थोडक्यात माहिती लिहणे. १८ फेब्रुवारी रोजी उर्दू गीते, गझल आणि विनोदांचे पठण करने आणि ते लक्षात ठेवणे. २० फेब्रुवारी रोजी समारोप आणि पुरस्कार वितरण समारंभ घेतला जाईल असे अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे अध्यक्ष सलीम खान पठाण यांनी सांगितले.

या सप्ताहात सहभागी होणाऱ्या मुलांचे तसेच या वर्षी ज्या पालकांनी आपल्या मुलांना शाळेत दाखल केले आहे त्यांचे विशेष स्वागत केले जाईल.

सप्ताहात दररोज किंवा कोणत्याही एका दिवशी आपापल्या शाळांमधून पदवीधर झालेले आणि उर्दू माध्यमाच्या पलीकडे उच्च शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी आणि आज समाजात चांगले पद भूषवणाऱ्या किंवा यशस्वी उद्योजकांना मुलांसमोर आमंत्रित केले जाईल आणि त्यांचे स्वागत केले जाईल, असे सचिव आबीद दुलेखान यांनी सांगितले.

या व्यतिरिक्त उर्दूच्या प्रचारासाठी योग्य वाटणारी कोणतीही कृती शाळेत करता येईल. या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना शाळा प्रशासन समिती, शिक्षक आणि समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने बक्षिसे दिली जाईल, असे सहसचिव डॉ. कमर सुरुर यांनी सांगितले. सर्वांना प्रोत्साहन देण्यासाठी या सप्ताहात सक्रिय असलेल्या सर्व शिक्षकांना जिल्हास्तरावर २० ते २५ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या समारंभात ट्रॉफी देऊन सन्मानित केले जाईल, असे सलीम खान पठाण यांनी सांगितले.

हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी के. के. खान, शरफुद्दीन शेख, अन्सार शेख, नवीद मिर्झा, शाकीर अहमद शेख, इमाम सय्यद, फैयाज शेख, शबनम खान, नर्गिस इनामदार, हनीफ शेख, नौशाद सैय्यद, अनिस शेख, बदर शेख, जमीर शेख, साजिद कुरेशी, वसीम शेख, हारुण कुरेशी, जावेद शेख, सुभान सय्यद, नाजमा शेख, तनवीर रजा शेख, मोहम्मद उमर बागवान, फिरोज खान पठाण, अरबाज पठाण, शाहनवाज गुलाम, इकबाल काकर, मुबशीर खान, शबिस्ता शेख, जहीर शेख, आरिफ दस्तगीर, महमूद शेख, मुनव्वर शेख, मतीन मनियार, हुसेन मोमीन, इलियास शहा, साजिद शेख, जहीर काकर, फिरोज शेख, उसमान तांबोळी, सिद्दीक बागवान, वहिदा सय्यद, शाहीन शेख, अल्ताफ शाह, आसिफ शेख, जाकीर शाह, मिनाज शेख, अस्मा पटेल, आमरीन पठाण, यास्मिन शेख, नसरीन इनामदार, नाजिया शेख व जिल्ह्यातील परिषदेचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.



के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात 'लोकशाहीतील बदललेले कायदे आणि विद्यार्थ्यांची कर्तव्ये' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

# कायदेशीर जागरूकता समजून घेणे महत्वाचे

## प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांचे प्रतिपादन; के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात कार्यशाळा

नगर – आजच्या जलद बदलत असलेल्या जगात कायदेशीर जागरूकता समजून घेणे महत्त्वाचे आहे. कायदा हा फक्त वकील किंवा गुन्हेगार प्रकरणांमध्ये असलेल्या व्यक्तींनाच लागू होतो असं नाही. प्रत्येक व्यक्तीला, विशेषतः विद्यार्थ्यांना, जबाबदार आणि माहितीपूर्ण जीवन जगण्यासाठी कायदेशीर जागरूकता असावी लागते. कायदेशीर जागरूकता हे हक्क आणि जबाबदाऱ्या यांच्यातील संतुलन राखण्यासाठी महत्त्वाचे आहे. केवळ आपल्याला कायद्यातून मिळणारे फायदे आणि संरक्षण समजून घेणं नव्हे तर आपण कायदेशीर चुकांपासून कसे वाचू शकतो हे देखील समजून घेणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी केले.

के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात 'लोकशाहीतील बदललेले कायदे आणि विद्यार्थ्यांची कर्तव्ये' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भिंगार पोलीस स्टेशन कॅम्पचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे पालन करण्यास सांगून सक्षम नागरिक बनण्यासाठी मार्गदर्शन केले.

ॲड. अश्विनी गीते यांनी लोकशाहीतील कायद्यांमध्ये नव्याने झालेल्या बदलांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्रा.स्नेहल बोरावके यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ.वर्षा कीर्तने यांनी करून दिला. प्रा.आरती सांगळे यांनी आभार मानले. याप्रसंगी संबंधित विषयावर विद्यार्थ्यांची क्विज कॉम्पिटिशन घेण्यात आली.

याप्रसंगी ॲड. गीते, श्री. गव्हाणे, महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक संतोष मुनोत, प्रा.सविता चव्हाण, सौ. अमृता मुळे व विद्यार्थी उपस्थित होते.

# सद्गुरु गोपालगिरी महाराज पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

## वाडियापार्क येथील श्री नागेश्वर महादेव मंदिरात भाविकांना महाप्रसादाचे वाटप



सद्गुरु गोपालगिरी महाराजांची २६ वी पुण्यतिथी विविध धार्मिक सोहळ्याने साजरी करण्यात आली.

नगर – शहरातील टिळकरोड, वाडियापार्क येथील श्री नागेश्वर महादेव मंदिर येथे सद्गुरु गोपालगिरी महाराज यांची २६ वी पुण्यतिथी विविध धार्मिक सोहळ्याने पार पडली. गोपालगिरी महाराजांचे समाधी पूजन, पूजा व अभिषेक करुन भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी नागेश्वर भजनी मंडळाचा सांप्रदायिक भजन कार्यक्रम देखील रंगला होता.

श्री नागेश्वर महादेव सेवाभावी संस्था ट्रस्ट, भक्त मंडळ, श्री लोकमान्य टिळक मित्र मंडळ, टिळक रोड रिक्षा स्टॉप युनियन व माथाडी कामगार संस्थेच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर व शहर सचिव दत्ता गाडळकर यांच्या हस्ते भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिराचे महंत ठाकुरदास महाराज यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये झालेल्या कार्यक्रमासाठी श्री नागेश्वर महादेव सेवाभावी संस्था ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ गणपत गाडळकर, गोरख पडोळे, प्रकाश सैंदर, महेश एकाडे, पंचम पडोळे, मनोज लाटे, सुमित फुलडहाळे, राजू पाचारणे, अनिरुध्द कदम, सचिन घोरपडे, सचिन राऊत, अभिषेक पाथरकर, भाऊ गजबे, सुभाष जपकर, रामदास पाचारणे, सखाराम जाधव आदींसह भाविक व महिला देखील उपस्थित होत्या.

अभय आगरकर म्हणाले की, गोपालगिरी महाराजांनी दिलेला धार्मिक व सामाजिक संदेश सर्वांसाठी दिशादर्शक आहे. त्यांनी धार्मिकतेबरोबर सेवाभाव जपला आणि या सेवाभावातून त्यांनी अनेक गोरगरिबांची सेवा केल्याचे त्यांनी सांगितले.

दत्ता गाडळकर म्हणाले, गोपालगिरी महाराजांनी उपेक्षित घटकांना आधार देऊन धार्मिकता रुजवली. सर्व समाजातील वंचितांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळे परिसरातील मोठा भाविक वर्ग त्यांना जोडला गेला. श्री नागेश्वर महादेव मंदिराच्या उभारणीसाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांचा हा धार्मिकतेने जोडलेला सेवाभाव पुढे घेऊन जाण्याचे कार्य सर्व सेवेकरी करत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



श्री बाणेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

# श्री बाणेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत वृक्षारोपण

नगर – श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ फेब्रुवारी रोजी माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला.

यादरम्यान सर्व माजी विद्यार्थी महाविद्यालयास प्रत्येकी एक वृक्ष भेट स्वरूपात दिला. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे व तसेच झाडे लावा झाडे जगवा; हा या वृक्षारोपणाच्या उपक्रमातून संदेश सर्वाच्या मनात उमटवला. यावेळी संस्थेचे संचालक अक्षय कर्डीले, प्राचार्य डॉ.व्ही. एम. जाधव, प्राचार्य हापसे, बी.एड. कॉलेजचे प्राचार्य शिर्के, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. शिंदे ऋषिकेश आणि माजी विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# स्किल इंडियासाठी केंद्राची ८८०० कोटींची तरतूद

## योजनेच्या प्रसारासाठी प्रयत्न आवश्यक : विनायक देशमुख



नगर – केंद्र सरकारने अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा स्किल इंडिया कार्यक्रमासाठी ८८०० कोटींची तरतूद केली आहे. आता ही योजना बेरोजगार तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायकराव देशमुख यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे सदर योजना पुढेही चालू ठेवण्यास आणि त्या योजनेत आवश्यक ती पुनर्रचना करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत १५ ते ५९ या वयोगटातील लाभार्थ्यांना विविध विषयांचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण पूर्णतः मोफत असून प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना प्राधान्याने बँकेकडून कर्जही उपलब्ध करून दिले जाते. तसेच विविध उद्योगातील नोकरीच्या संधी देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकतात.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय गतिशीलतेवर भर देण्यात आला असून जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त कौशल्यांनी सुसज्ज मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

कौशल्य विकास व रोजगार मंत्रालयाने विविध देशांसोबत मोबिलिटी भागीदारी करार आणि सामंजस्य करार केले असून या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांच्या आंतरराष्ट्रीय गतिशीलता संधी वाढविण्यासाठी डोमेन कौशल्ये, संयुक्त प्रमाणपत्रे, भाषा प्राविण्य आणि सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षण देण्यात येते. बेरोजगारी निर्मूलनासाठी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून जास्तीत जास्त युवकांनी याचा लाभ घेणे आवश्यक आहे. सदर योजना ग्रामीण भागातील पात्र युवक, युवतींपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी जास्तीत जास्त प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत श्री. देशमुख यांनी व्यक्त केले.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेत असतात. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ग्रामीण भागातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्याबाबत आपण ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्याशी बोलणार असल्याचे श्री. देशमुख यांनी सांगितले.

# गरुड हॉस्पिटलमध्ये जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी उपक्रम



जागतिक कॅन्सर दिनच्या निमित्ताने गरुड हॉस्पिटल जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी शिबीर उत्साहात पार पडले.

नगर – ४ फेब्रुवारी जागतिक कॅन्सर दिन च्या निमित्ताने गरुड कॅन्सर हॉस्पिटल आणि रेडिएशन सेंटर अहिल्यानगर यांच्यावतीने कॅन्सर जनजागृती आणि मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे गरुड कॅन्सर हॉस्पिटल येथे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रांताधिकारी सुधीर पाटील, नायब तहसीलदार अभिजीत वांडेकर, डॉ. प्रकाश गरुड, स्त्री रोग कॅन्सर तज्ञ डॉ. सौ. पद्मजा गरुड, रेडिएशन कॅन्सर तज्ञ डॉ. मनोज बिराजदार, कॅन्सर तज्ञ डॉ. अर्चना तांबोळी, कॅन्सर तज्ञ डॉ. प्रवीण बोस हे उपस्थित होते. हॉस्पिटल मधील सिस्टर लक्ष्मी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली आणि कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.


प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी हॉस्पिटल आणि सेंटर व कार्यक्रमाविषयी गौरवोद्गार काढले. हे सेंटर अहिल्यानगर येथे झाल्यामुळे आता कॅन्सर रुग्णांना उपचारासाठी पुणे, मुंबई सारख्या शहरात जाण्याची आवश्यकता नाही. जागतिक दर्जाचे कॅन्सर उपचार या सेंटरमध्ये उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले. रुग्णांनी न घाबरता उपचार करून घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रकाश गरुड यांनी कॅन्सरबद्दल माहिती दिली, समाजामध्ये कॅन्सरबद्दल असलेले समज गैरसमज तसेच व्यसनाकडे चाललेली पिढी, याबद्दल विशेष करून माहिती दिली. वेळीच उपचार झाले तर कॅन्सर पूर्णतः बरा होऊ शकतो आणि वरील सर्व उपचारासाठी सेंटर मध्ये सर्जरी, केमोथेरपी, आणि रेडिएशन महात्मा फुले योजनेमध्ये तसेच विमा पॉलिसीमध्ये उपलब्ध असल्याचे सांगितले. पण त्यापेक्षा कॅन्सर होऊच नये यासाठी आपण आपल्या आहारात योग्य बदल करावा. सर्व पालेभाजी, फळे आहारात असावेत आणि घरीच बनवलेला आहार घ्यावा. तसेच रोज आपणास जो आवडेल तो व्यायाम करावा, असे सांगितले.

डॉ. पद्मजा गरुड यांनी स्त्रियांनी स्वतःकडे लक्ष द्यावे, जर कसलेही प्रकारची गाठ किंवा काही त्रास होत असेल तर अशा वेळी आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधून वेळीच निदान करून घ्यावे, जेणेकरून हे सर्व आपल्या कुटुंबासाठी पण आणि स्वतःसाठी पण योग्य राहील. वर्षातून एकदा तरी आपण स्वतःची आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले. त्यानंतर प्रेक्षकांमधून दोन रुग्णांनी, जे आता कॅन्सर मधून पूर्णतः बरे झालेले आहेत, अशा लोकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात सहज योग ध्यान धारणा टीम उपस्थित होती. त्यानंतर रसाळकर सर यांनी ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून माहिती दिली. स्वतः साठी दररोज दहा मिनिटे वेळ काढून सहयोगच्या जे काही योग सांगितले आहेत, त्याप्रमाणे व्यायाम करण्याचे सांगितले. यामुळे नक्कीच पूर्ण शरीरावर चांगला प्रभाव पडतो असे सांगितले.

# श्री साईबाबा मंदिरात ९ वा वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम



भिंगार – सालाबादप्रमाणे भिंगार पंचक्रोशीतील राधानगरी नागरदेवळे येथील श्रद्धास्थान 'श्री साईबाबा मंदीरचा नववा वर्धापन दिन सोहळा' निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री साई चरित्र पारायण, सौ.धनश्री शिंदे (सनातन संस्था) यांचे साधना विषयक प्रवचन, हरिपाठ तसेच शुक्रवारी सायंकाळी ७ वाजता रामायणाचार्य हभप गोरक्षनाथ दुतारे महाराज यांच्या वाणीतून भजन संध्या कार्यक्रम झाला. साई मंदिराचे संस्थापक, अध्यक्ष महेश राजेंद्र झोडगे, उपाध्यक्ष दिलीप गुगळे, शास्त्रीय संगीत विशारद ओंकार देऊळगावकर, मंदिराचे पुजारी देशपांडे गुरुजी, आशुतोष गलांडे, ओंकार आव्हाड, गौरव त्रिमुखे, आदित्य कापरे आदींसह मंडळाचे कार्यकर्ते, सर्व भजनी मंडळ नागरदेवळे व भिंगार तसेच साई भक्तगण उपस्थित होते.

भजन संध्येत साई तुझ्या दर्शनाची ओढ लागली, तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे रे...,साई तुझे नाव गोड आदी साईंच्या भजनांनी राधानगरी दुमदुमली. शनिवारी संध्याकाळी ५ वाजता श्री साईंची पालखी मिरवणूक व ग्रामप्रदक्षिणा होणार आहे. तसेच रविवारी सायंकाळी ७ वाजता महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी साई भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन साई मंदिराचे संस्थापक अध्यक्ष महेश झोडगे यांनी केले आहे.



शिर्डी रोडवरील विळद येथे काळेज् ऑर्किड रिसॉर्टचे नुकतेच उद्घाटन झाले.

# 'काळेज् ऑर्किड रिसॉर्ट' पर्यटन म्हणून पाहिले जाईल

## पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन

नगर – शिर्डी रोडवरील विळद येथे काळेज् ऑर्किड रिसॉर्ट हे नगरच्या जिरायत भागात पर्यटन म्हणून पाहिले जाईल, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

ते नुकत्याच रिसॉर्टच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांच्या मातोश्री श्रीमती शांताबाई काळे व त्यांच्या कन्या कु. सई व कु. राजनंदिनी यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन झाले. यावेळी सुजय विखे पाटील, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, शाहीर विजय तनपुरे, जि. प. सदस्य संदेश कार्ले, शिक्षक आप्पा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला.

यावेळी पुढे बोलतांना पवार म्हणाले की, नगरकरांना आता महाबळेश्वर, लोणावळा–खंडाळा येथे जाण्याची गरज राहणार नाही. येथे त्या हिलस्टेशन सारखाच थंडगार फील येत आहे.

सुजय विखे पाटील म्हणाले की, नाशिकच्या धर्तीवर बॅकवॉटरला जसे टुरिझम झाले आहे तसे विळदलाही पर्यटन वाढेल व त्यामुळे नगर शहरात पर्यटन वाढण्यास नक्की हातभार लागेल. काळे कुटुंबांनी केलेला पर्यटनवाढीसाठी केलेला हा प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमास अभय आगरकर यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या हस्ते रिसॉर्टच्या वेबसाइटचे उद्घाटन करण्यात आले. सौ. मनिषा बारस्कर–काळे यांनी आभार मानले.

# अहिल्यानगरमधील यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालयातील विद्यार्थी राज्यामध्ये झळकले



कु. ध्रुवी पांचाळ



कु. वैष्णवी गुंड

नगर – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या बीडीएस चतुर्थ वर्ष २०२३ – २०२४ पदवी परीक्षेसाठी घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यार्थ्यांमध्ये यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय, अहिल्यानगर या महाविद्यालयातील कु. पाचांळ ध्रुवी हिने दुसरा क्रमांक आणि कु. गुंड वैष्णवी यांनी पाचवा क्रमांक प्राप्त केला.

या गुणवंत विद्यार्थीनींच्या यशाबद्दल महाविद्यालयाच्या उपाध्यक्षा कु. नेहल प्रशांत गडाख पाटील, मुळा एज्युकेशनचे उपाध्यक्ष उदयन शंकारराव गडाख पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष देवढे पाटील, तसेच अधिष्ठाता डॉ. राजहंस निलिमा श्रीपाद यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

